IRBK-0100557

म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे

विषय नाटक

दा क्र ५५७

IRBK-0100557

ॐ नमो भगवते वासुदेवाय.

# “नवा खेळ”

## एकांक प्रवेशी
## गद्यपद्यात्मक नाटक


लेखक,

**भार्गवराम विठ्ठल वरेरकर.**

जाविहारी, हाच मुलाचा बाप, संन्याशाचा संसार, त्तेचे गुलाम,
लयाचा लय, तुरुंगाच्या दारांत, लढाईनंतर, रंकाचें वैभव इ.
नाटकांचा कर्ता.



सन १९२४.

प्रकाशक,

**मेसर्स बी. डी. ब्रदर्स,**

२०, कांदेवाडी, मुंबई.



IRBK-0100557

सर्व हक्क ग्रंथकर्त्यांच्या स्वाधीन.


**किंमत सव्वा रुपया.**

प्र.

स्ता

व

ना.

---

" नित्य तुम्हीं प्रभुपाशीं पेढे बरफी 'नवा खवा' खावा ।
परि म्यां एके दिवशीं रेवडिचा स्वाद कां न चाखावा ? ॥
( मोरोपंत )

मुंबई, गांवदेवी.
ता. १४-९-१९२४

सर्वांचा नम्र सेवक
भार्गवराम विठ्ठल वरेरकर

---

मुद्रक—
पृष्ठ १—२४ रा. महादेव सखाराम थोरात, 'हेरल्ड' प्रिंटिंग प्रेस, गिरगांव बॅकरोड, मुंबई नं. ४.
आणि
पृष्ठ २५—८० रा. रामचंद्र नारायण मंडलीक, बी. ए. लोकमान्य प्रेस, रास्ती बिल्डिंग, गिरगांव, मुंबई नं. ४.
प्रकाशक—रा. भालचंद्र दत्तात्रय पनवेलकर, २०, कांदेवाडी, मुंबई

इसवी सन एकोणीसशें चोवीस सालच्या सपटेंबर महिन्याच्या चौदा तारखेस दिवसा नाट्यकलाप्रवर्तक संगीत नाटक मंडळीनें मुंबई येथें न्यू एल्फिन्स्टन थिएटरांत या नाटकाचा पहिला प्रयोग केला.

शं[illegible]च—श्रीयुत महादेव हरी जोगळेकर.

श्रीध[illegible]—श्रीयुत यशवंत सदाशिव मिराशी.

भगवंतर. —श्रीयुत भैरव महादेव हातवळणे.

विठोबा—श्रीयुत दत्तात्रय बळवंत साने.

बाबासाहेब—श्रीयुत सुंदर श्रीधर पाटकर.

नारायणराव—श्रीयुत नारायण बळवंत जोशी.

गुंड्डू—श्रीयुत परशराम गणेश खरे.

---

गिरिजाबाई—श्रीयुत गणेश बळवंत भाटे.

लक्ष्मी—श्रीयुत गोविंद हरिश्चंद्र मुळगांवकर.

भद्राबाई—श्रीयुत केशव भास्कर शेंडे.

चंपा—श्रीयुत अच्युत पांडुरंग पाटणकर.

छबी—अंबादास विनायक आपटे ( मास्टर नाना )

चांद्रिका, तारका, लतिका, कलिका } दत्तात्रय आत्माराम भिडे, रामचंद्र नामदेव तळेकर, केशव वामन देशपांडे, राजाराम बाळाराम सावंत.

---

स्टेज मॅनेजर—श्रीयुत भैरव महादेव हातवळणे.

हार्मोनियम मास्टर—श्रीयुत शंकर लक्ष्मण सप्रे.

तबलजी—श्रीयुत यशवंत रामचंद्र शिंदे.

---

फोटोग्राफर—श्रीयुत मोरेश्वर नारायण कीर्तीकर.

---

अंक पहिला—स्थळ—मुंबई येथील शंकरराव यांच्या बंगल्यांतील दिवाणखाना.

अंक दुसरा—स्थळ—गिरगांवातील एका भिकार चाळींतील खोली.

अंक तिसरा—चर्नीरोड गार्डन, मुंबई.

अंक चवथा—पहिल्या अंकाप्रमाणें.

नाटकाचा काल अगदीं १९२४ सालचाच असून पहिला व दुसरा अंक यामध्यें चोवीस तासांचें अंतर आहे. दुसरा व तिसरा या अंकामध्यें तीन महिन्यांचें अंतर असून तिसरा व चवथा अंक यामध्यें चोवीस तासाचें अंतर आहे.

---

॥ ॐ नमो भगवते वासुदेवाय ॥

# नवा खेळ

ग्रंथ सं
नं. ३०२
ता. २५।९।२५

## अंक पहिला.

स्थळ—शंकररावांचा दिवाणखाना.

( गिरिजा एक कागदावर लिहिलेलें पद्य वाचित आहे. लक्ष्मी तिच्या मागें उभी राहून पाहात आहे. भद्रा जवळच खुर्चीवर बसून ऐकत आहे. व थोड्या अंतरावर विठोबा छताकडे डोळे लावून तटस्थ उभा राहिला आहे. छबी या सर्वांकडे पाहात जमिनीवर बसली आहे. )

गिरिजा—

पद–भूप–त्रिवट–( तुम हमसंग जिन बोल )

घटिं घटिं हरि भरला जगिं जनता । विरचित जीव जगा अखिला । नमन सकल चरणा ॥ धृ ॥ कुणा स्तवूं कुणि स्तवन करावें । भ्याला जीव निरामया । स्मरुनि जनन मरणा ॥ १ ॥

भद्रा—वाचलंत ? कसं काय वाटलं ?

गिरिजा—काय सांगुं भद्राबाई ?

भद्रा—अगदीं खरं खरं तें सांगा. रुचलं तर होय ह्मणा नाहींतर—

लक्ष्मी—आई, हें पद पूर्वी वाचल्याचं नाहीं आठवत तुला ?

गिरिजा—मी तोच विचार करतें आहें.

छबी—विचार कसला ? श्रीधरभाऊचं पद नाहीं का तें ?

गिरिजा—खरंच छबे ! आपल्या गेल्या संमेलनावेळीं त्यांनीं तयार करून दिलं होतं !

भद्रा—आतां काय सांगावं ? हीं पोरं सांगतात आणि तुह्मी ऐकतां ! अहो माझ्यासमक्ष त्यानं लिहिलं. असा आकाशाकडे डोळे लावून आत्तांच राहिला आहे कीं नाहीं अस्साच—अगदीं वर डोळे लावून—बसला होता. चटकन उठला, कागद पेन्सिल घेतली, नी भराभरा ल्याहायला प्रारंभ केला. जें लिहिलं तें हें—

गिरिजा—पाठच केलेलं असेल.

भद्रा—आमच्या विठोबावर आपला तुमचा रागच. जीव तोडून सांगि-तलं तरीं कांहीं पटत नाहीं. मला खोटं सांगण्यांत काय फायदा ?

गिरिजा—पण तुम्ही खोटं सांगतां असं मी कुठं म्हणतें आहे ?

भद्रा—तर मग काय तो खोटं बोलतो ? मला खोटी म्हणा हवीतर, पण विठोबा—नाहीं बरं ! प्राण गेला तरी आमचा विठोबा खोटं बोलायचा नाहीं.

गिरिजा—तर मग एकदां खोटं बोलच म्हणावं !

भद्रा—पहा-पहा तर खरं त्याच्याकडे. कांहीं आहे का तुमच्या बोल-ण्याचा परिणाम ? सारखा आकाशाकडे—

गिरिजा—छताकडे !

भद्रा—छे हो ! आकाशाकडे पाहातो आहे. या कवींना सारी सृष्टी दृष्टिआड झालेली असते. छतंबितं पार फोडून त्याची नजर नक्षत्रांवर खिळली आहे.

छबि—दिवसाच ? दिवसा कुठ दिसतात नक्षत्रं ?

गिरिजा—बरी बोललीस नक्षत्रासारखी !

भद्रा—पहा—पहा—ते पहा. ओंठ हालू लागले. आतां सुचलंच बरं काव्य ! वा लक्ष्मी, तूं तर सारखीच पहाते आहेस आमच्या विठोबा-कडे ! दृष्ट पडायची माझ्या कविराजाला ! बाकी आमची लक्ष्मी देखील

आमच्या विठोबासारखीच मितभाषणी आहे. काय पण विठोबारखुमाईचा जोडा शोभेल.

**विठोबा**—तो पहा—तो पहा—अहाहा! तो पहा! ( सर्व दचकून उठतात. )

**गिरिजा**—कोण—कोण तो ?

**विठोबा**—कोळी—हृदयाचे ततू ताणून तणाव तरळणारा कोळी, वा कोळ्या—!

( विठोबा गाऊं लागतांच भद्रेखेरीज सर्व मटकन खालीं बसतात. )

( गजल )

**खरा षट्पाद तूं मित्रा । भ्रमरसा मी तुझ्या भोंती ॥**
**तुझी तरवार पांयाची । जिवाची नाचवी ज्योति ॥ १ ॥**
**न धागा हा तुझा वाटे । उसासा शुष्क प्रेमाचा ॥**
**मुनाफा हा बहिश्ताचा । विधीचा इश्क नेमाचा ॥ २ ॥**
**विणाया जाल जगताचें । तुझा ताणा तुझा वाणा ॥**
**बहाणा हा कळे सारा । जगाचा गांधि तूं प्यारा ॥ ३ ॥**
**न वाटे हें तुझें जाळें । जगाचीं गुंफिलीं—गुंफिलीं—**
**गुंफिलीं** ( थांबतो )

**गिरिजा**—पाळें—गुंफिलीं पाळें—

**विठोबा**—जगाचीं गुंफिलीं पाळें! स्फूर्तिदेवते, गिरिजाबाईंच्या गिरेनें गिरवलेली ही गिर्वाण गिरा आज माझी अब्रू वचावती झाली बाईसाहेब, खरोखर माझी स्फूर्ति तुम्हीच आहांत. तुमचा सहवास, तुमचा संसर्ग, नुसत्या तुमच्या पायरीच्या स्पर्श माझ्या स्फूर्तीला चैतन्य देतो. माझं सारं काव्य तुमच्यासाठीं. जगाला त्याची काय किंमत ?

**गिरिजा**—एक कवडी. विठोबा जग तुला कवडीमोल वाटत असेल, पण या जगांत तुझी किंमत एक कवडी.

**विठोबा**—खरोखरच मी धन्य. माझी किंमत एक कवडी तरी ठरली, पण या जगांत अशीं माणसं आहेत कीं त्यांची किंमत एक कवडी सुद्धा होणार नाहीं. आणि असलींच माणसं जगांत बिनमोल ठरत असतात.

छबी—वा ! काय बिनमोल बोललांत ?

भद्रा—छबे, मोठ्यांच्या भाषणांत पोरांनीं तोंड घालूं नये. लक्ष्मी, बाळ, तुला कसं काय आवडलं हें कोळ्याचं काव्य !

लक्ष्मी—मी पोर आहें मावशीबाई. मी कशाला असल्या मोठ्या विषयांत तोंड घालूं ?

विठोबा—भद्रामावशी, हेंच खरं उत्तर. मौनाची बोली अपरिसीम आहे. मौनाचे फवारे ऊसळत्या काव्याला उधळून लावतात. मौनाच्या लाटांवर जीवाची ज्योत तरंगूं लागते. मौनाच्या तुफानांत बावळ्या प्रेमाचं सावळं गलबत पाझरूं लागतं. मौनाच्या मुकेपणाला—

गिरिजा—खामोष. मौनाचं वर्णन मौनानंच चांगलं होतं. विठोबा, अगदीं बोलल्याशिवाय स्वस्थ बसलास तर तुला कुणीं ठोंबा ह्मणणार नाहीं.

विठोबा—बाईसाहेब, मी मुकाच आहें. पण स्वर्गीय स्त्रीजातीचं दिव्य दर्शन माझ्या मवाळ मुकेपणाला नेस्तनाबूत करून जिव्हाळींच्या भाषेला जिव्हेवर जिववितं. ( श्रीधर येतो ) हा आला बुड्ढा तरुण !

गिरिजा—काय छान वर्णन केलं या आमच्या श्रीधरपंतांचं !

विठोबा—छे ! छे ! ही निंदा होती—ही शिवी होती. हा गालिप्रदानाचा गाळ मी श्रीधरपंतांच्या अंगावर उधळला होता.

श्रीधर—एवढी फाल्गुनी झाल्यावर धुळवटींत शेवट झालाच पाहिजे.

छबी—काय शेणसडा केलात विठोबाच्या काव्याचा !

लक्ष्मी—( कागद श्रीधरपंताला दाखवून ) हें पद कुणाचं ?

विठोबा—तुझ्या पदकमलाच्या दासाचं !

श्रीधर—अस्सं ! छबे हें पद कुणाचं ?

छबी—माझं. पाठ ह्मणून दाखवूं का ?

श्रीधर—नको. मीच पाठ करवून घेतलं होतं, तें सर्वांना माहीत आहे.

भद्रा—मला नाहीं माहीत.

श्रीधर—सभ्य माणसांच्या संमेलनाच्या वेळीं तें ह्मटलं होतं. तुह्माला माहित असणं शक्य नाहीं.



लक्ष्मी—हें काव्य कोणाचें ?

विठोबा—श्रीधरपंत, या काव्याचा कर्ता मी आहें.

गिरिजा—कर्म आमचं. वाटेल त्यानं वाटेल तें बोलावं आणि आम्ही मुकाट्यानं ऐकावं, असंच आमचं नशिब आहे. श्रीमंतीमुळं केव्हां केव्हां नसत्या आपत्ती येत असतात, त्यांतलीच ही एक.—

पद—सिंदुरा–त्रिवट (पीतम प्यारेको)

ती कमला वेडी । लाभे ज्या लोकां ।
होतसे विकासें विषफला ॥ धृ ॥
त्रास विपिनिंचा । घरीं सुखि राहतां ।
करिते धीरा हतबला ॥ १ ॥

श्रीधर—बाईसाहेब, आपत्ती गरीबींत आहेत—श्रीमंतींत नाहींत.

गिरिजा—अनुभवाशिवाय कळायचं नाहीं. गरिबांपेक्षां श्रीमंताच्या मागंच संकटं फार.

विठोबा—ईश्वर करो आणि तसलींच संकटं माझ्यावर येवोत.

छबी—तुह्मींच आहांत कीं एक संकट !

भद्रा—छबे, तूं आतां तोंड आटपशील जरा ! गिरिजाबाई, छबी ह्मणते पद माझं, श्रीधरपंत ह्मणतात पद माझं आणि मी प्रत्यक्ष सांगतें पद विठोबाचं. आतां खरं कोण ?

गिरिजा—तें ज्याचं त्यानं ओळखून घ्यावं. छबीचं तर खास नव्हे. असं पाठ ह्मणून मालकी येईल तर प्रत्येक हरदास मोरोपंत ठरेल. सध्यां हा कागद आहे माझ्या हातांत. मी म्हणतें हें पद माझं. छबे, हा कागद नेऊन ठेव पाहूं माझ्या पेटींत. (छबी जाते) विठोबा, मी हें पद तुझं ठरवलं तर तूं मला काय देशील ?

विठोबा—देईन, बाईसाहेब मी देईन, मी तुम्हांला धन्यवाद देईन.

गिरिजा—आणि श्रीधरपंत तुम्ही हो ?

श्रीधर—कुणालाही द्यायला माझ्याजवळ कांहींच नाहीं.

गिरिजा—तर मग विठोबा हें पद तुझंच.

विठोबा—A Daniel is come to judgment ए डॅनियल इज कम् टु जज्‌मेंट. स्त्रीदेवतेच्या घरीं तरी न्याय आहे खास. I thank you from the bottom of my heart.

लक्ष्मी—विठोबा, हें पद यांचं. मला माहीत आहे.

विठोबा—स्त्रीदेवतेच्या कौमार्यस्वरूपा, तुझा माझ्यावर हा रुसवा कां?

भद्रा—तिचं पोरीचं काय ऐकतोस विठोबा ? गिरिजाबाई, आतां असं सांगा, तुह्मांला तें कसं काय आवडलं ?

गिरिजा—आवडलं म्हणून तर पेटींत ठेवलं.

शंकरराव—( प्रवेश करून ) काय आवडलं ?

गिरिजा—आपल्या विठोबाचं पद.

विठोबा—माझं काव्य.

शंकर—आपल्याला काव्यांत कांहीं कळत नाहीं. पण यांना त्याची मोठी आवड. बरं का भद्राबाई, लोकांच्या बायकांत गोमय लुडबुडतं, पण आमच्याकडे नुसती वाङ्मय चर्चा. काय ? जमलं कीं नाहीं ?

विठोबा—पुष्पसंगें मातीस वास लागे.

शंकर—अरे लेका, मला अगदीं मातीमोल ठरवलंस. पण संसर्ग पुष्पाचा आहे ना ? काय श्रीधर ?

श्रीधर—खरं आहे.

शंकर—अरे खरं आहे काय ? म्हणजे मी मातीमोल ! हं समजलों--तूं काय सांगणार तें आलं माझ्या ध्यानांत. पण आपली गंमत केली. आज लवकरसा आलास घरीं ! कारखान्यांत नाहीं गेलास वाटतं ? तें तुझं पाणी कुठपर्यंत आलं ? ( हसून ) खरडे घासतां घासतां यानं म्हणे हत्यारांना पाणी द्यायचा एक नवा शोध काढला आहे. ऑफिसचं काम चुकवून कारखान्यांत बसायचं आणि कां तर म्हणे शोध. एडिसनचा बापच जसा कांहीं बेटा.

श्रीधर—आज माझा प्रयोग पुरा झाला. पुर्णपणें यशस्वी ठरला.

**शंकर**—मग पेटंट घे ना त्याचं आतां. काय आचरट आहे. शोध ह्मणे यशस्वी ठरला! आतां आमच्या सर्जिकल इंस्ट्रुमेंट फॅक्टरीला एक कॉंपिटिटर मिळणार.

**गिरिजा**—कुणाच्या हातून काय होईल कांहीं सांगतां यायचं नाहीं.

**भद्रा**—मी जातें आतां घरीं. पुन्हा येईन उद्यां. लक्ष्मी, येतें वरं का?

**विठोबा**—स्फूर्तिदेवते, मी तुला प्रणाम करून निघून जातों.

( दोघे जातात. )

**शंकर**—काय ह्मणाला तो?

**गिरजा**—तें काव्य आहे त्याचं. ऐकण्यासारखं मोठं कांहीं नसतं त्यांत.

**शंकर**—मुलगा मोठा गुणी आहे. विद्वान आहे. या श्रीधरसारखा बावळा नाहीं. ह्मणे शोध! वा! आणि तें तुझं नाटक?

**श्रीधर**—तेंही पण बहुतेक पुरं होत आलं आहे.

**शंकर**—असं का? आतां असं पाहा. तूं कारकून आहेस. नोकर आहेस. आधीं आपली नोकरी चोख रीतीनं बजाव. चार पैसे शिल्लक टाक. रजा घेऊन जा महाबळेश्वरला आणि मग वाटेल ते चोचले कर. माझ्या ऑफिसांतले कारकून कारकूनच राहिले पाहिजेत. मधुकरी मागून अभ्यास करित होतास तें विसरलास वाटतं? अजूनही तेंच सुरू आहे की. कुठलाही धनी आपल्या कारकुनाला असा फुकट जेवायला घालीत नाहीं. गिळायला मिळालं आयतं ह्मणजे सारीं ढोंगं सुचतात.

**श्रीधर**—ऑफिसच्या कामाची मीं कधींही खोटी केली नाहीं.

**शंकर**—कुणी ह्मटलं खोटी केलीस ह्मणून? पण यापुढं कशा-वरून करणार नाहींस.? नाटककार ठरलास कीं शिंगं फुटूं लागतील.

**लक्ष्मी**—मी देखील फुकटच जेवतें आहें बाबा!

**गिरिजा**—गप बैस पोरी. फराळ करायचा आहे ना आतां? कोण रे गुंड्या? वाढलंस का फराळाचं? ( गुंड्या येऊन वाढल्याचं

सांगतो. ) चलायचं तर मग. फराळ केल्यावर मग घ्याऽवा कुणाचा तो समाचार. ( गिरिजा व शंकरराव जातात. )

**लक्ष्मी**——बाबांचं बोलणं मनावर घ्यायचं नाहीं.

**श्रीधर**——लक्ष्मी, मधुकरी मागून मी आयुष्य कंठलं आहे. कुणी कितीही कडू बोललं तरी माझ्या मनावर त्याचा परिणाम होत नाहीं. तुला आठवतं ना ? 'ओम् भवति भिक्षां देही' म्हणून मी या दारावर झोळी घेऊन येत असें त्यावेळीं तूं धावत धावत येऊन आपल्या चिमुकल्या हातांनीं मला दुप्पट मधुकरी वाढीत होतीस. मी तेव्हां हायस्कूल मधला विद्यार्थी होतों आणि तूं परकर नेसणारी चिमुकली छबकडी होतीस—

**पद**—भीमपलास–आडाचौताल–( गरीबनवाज )

**घरीं वनवास मला मनिं तदा झाला । जीवा**
**भ्याला ॥ धृ० ॥ मधुर सान मुख तुझें सुखसीमा ।**
**उदासी मना मोही प्रेमा धाला ॥ १ ॥**

**लक्ष्मी**——आठवणींचं स्वरूप गोड असलं तर त्याचा पुन्हां पुन्हां उच्चार करणं गोड वाटतं पण ही दुर्धर दारिद्र्याची——

**श्रीधर**——असं म्हणूं नकोस. दारिद्र्यामुळंच मला तुझ्या घरचा आसरा मिळाला. त्या आसऱ्यामुळंच तुझ्या आईनं माझ्या सारख्या अनाथालाही आपला जावई करण्याचा विचार केला—

**लक्ष्मी**——घरजावई ! घरजावई व्हायची शरम नाहीं वाटत तुम्हांला ?

**श्रीधर**——लक्ष्मी, तुझ्या आईनं तसं म्हटलं पण मी त्याला संमति दिली का ?

**लक्ष्मी**——अगदीं मनापासून ? कीं भगवंतरावाच्या भीतीनं ?

**श्रीधर**——अगदीं मनापासून. तुझ्या बाबांचीं एवढीं बोलणीं सहन करून ऑफिसचा वेळ चुकवून मी कारखान्यांत काम करायला कां जातों ! रात्रीचा दिवस करून नाटक लिहिण्यासारख्या बिकट भानगडींत मीं कां पडलों ! तूं म्हणशील कीं, कॉलेजांत जाणाऱ्या प्रत्येक मुलाच्या पाकिटांत एकेक नाटक असतं. त्यांतलंच हें. नाहीं बरं ! नांव मिळवण्यापेक्षां पैसे मिळवण्याच्या उद्देशानं मी हें नाटक लिहित आहें. यावर

पैसे मिळवले पाहिजेत आणि त्या पैशांवर विलायतेला जाऊन माझ्या शोधाची किंमत करून घेतली पाहिजे.

**लक्ष्मी**--माझ्या पाणिग्रहणाची इच्छा असेल तर असाच कांहीं पराक्रम दाखवा. मी प्रेमाची भुकेली आहें खरीं पण दारिद्र्यांत दिवस काढणं मला शक्य नाहीं. लहानपणापासून मी वैभवांत वाढलें आहें, तें ध्यानांत आहेना ?

**श्रीधर**--नाहीं. तें ध्यानांत घ्यायची मला जरुरी नाहीं. तुझ्यासाठीं नव्हे पण माझ्यासाठीं मला श्रीमंत झालं पाहिजे आहे. तुझ्या बापाच्या डिवचण्यासाठीं नव्हे पण माझ्या मनाच्या महत्त्वाकांक्षेसाठीं मला परदेशाचा मार्ग गांठला पाहिजे. लक्ष्मीं, तोंपर्यंत तूं माझी वाट पाहशील ?

**लक्ष्मी**-तोंपर्यंत म्हणजे ?

**श्रीधर**-म्हणजे मी तुझ्या तोलाचा श्रीमंत होईपर्यंत.

**लक्ष्मी**-म्हातारपणापर्यंत मला अविवाहित ठेवणार आहांत वाटतं !

**श्रीधर**-माझ्यावर तुझं खरोखरच प्रेम आहेना ?

**लक्ष्मी**-मी महाराष्ट्रांत जन्मलें आहें. विलायतेंत नव्हे. तुम्हीं श्रीमंत होईपर्यंत माझी आईबापं थोडीच वाट पाहणार आहेत !

**श्रीधर**-पण तूं काय करशील तें सांगना ?

**लक्ष्मी**-ब्राह्मणाच्या मुलीला तें सांगतां यायचं नाहीं.

**श्रीधर**-वल्लभाच्या रमणीला तरी तें सांगतां येईल ना ?

**लक्ष्मी**-हें नाटक नव्हे-हा हिंदूचा संसार आहे.

**श्रीधर**-शिदू माधुकऱ्याची ही प्रेम मधुकरीची याचना आहे. ती मधुकरी दुप्पट मिळत होती पण ही-( लक्ष्मी स्तब्ध राहते ) कां आतां मधुकरीही वाढायची नाहीं वाटतं ?

**लक्ष्मी**-अंतःकरणाला असे चिमटे कां घेतां ?

**श्रीधर**-परिस्थितीच तशी आली त्याला मी काय करूं ? बारा रुपयांच्या खोलींत राहायची तयारी आहे का ?

लक्ष्मी–केव्हांही नाहीं.

श्रीधर–मग मी श्रीमंत होईपर्यंत वाट पाहणार आहेस ?

लक्ष्मी—नाहीं—म्हातारपणापर्यंत कुमारी रहण्याची माझी तयारी नाहीं.

श्रीधर—तर मग साहेबांच्या म्हणण्याप्रमाणं भगवंतरावांशीं लग्न करणार आहेस ?

लक्ष्मी–मुळींच नाहीं. प्राण गेला तरी नाहीं.

श्रीधर–मग तू काय करणार ? घरजांवई पत्करणार ?

लक्ष्मी–विकल्या गुलामाची पत्नी मी कल्पांतींही होणार नाहीं.

श्रीधर–तसं करायला साहेबांची तयारी कुठं आहे म्हणा ! ठीक आहे, तुझा विचार तू पहा. ईश्वर मला काय मार्ग दाखवतो तें मी पाहतों.

लक्ष्मी–काय करूं ? मला सांगाना–मी काय करूं ?

पद—बिहागडा–झपताला.

हें धाम आराम । त्यजितां सफल काम ॥
होईल काय मम वासना ॥ धृ० ॥
भ्याल्या जिवाला । विधि पाशिं या ॥
मांगल्य देइ भयभावना ॥ १ ॥

श्रीधर–स्त्रीचं अंतःकरण आत्तां बोललं. लक्ष्मी, जसं यांत तुला कांहीं सांगतां येत नाहीं तसाच मीही इथं हतबुद्ध झालों आहें. विठोबासारखं चोरीवर कवि होतां येतं, तसं श्रीमंत होतां येत नाहीं. पोलीसची भिती–दरोडा घालून श्रीमंत झालों असतों तर चतुर्भुज व्हायची खात्री आहे पण ती अशी–अशी नव्हे.

लक्ष्मी–भलतंच ! पुन्हां हात धरायचा नाहीं बरं माझा.

श्रीधर–पुन्हा हात धरीन तेव्हां तुझ्या बापाच्या साक्षीनं. पुन्हा हात धरीन तो लग्नाच्या बेडीनं. ( भगवंतराव येतो. )

**भगवंत**—कुणाचा हात ? लक्ष्मीचा ? वा ! श्रीधरपंत, तुह्मीं नाटक लिहितां आहांत ह्मणून ऐकलं होतं, त्याची तालीम चालली आहे वाटतं ?

**श्रीधर**—भगवंतराव, आपलं आगमन हा त्यांतलाच एक भाग आहे. मोठी Dramatic situation आहे नाहीं ?

**भगवंत**—लक्ष्मी, घरांत जा.

**लक्ष्मी**—मला हुकूम करणारे तुह्मी कोण ?

**भगवंत**—तुझा भावी पति.

**लक्ष्मी**—लग्नाचा नवरादेखील एवढा अधिकार गाजवीत नाहीं. अजून बोहलं देखील दूर आहे.

**भगवंत**—तुला दूर वाटत असेल, मला नाहीं वाटत.

**लक्ष्मी**—लग्न लागलं तर मला असेच वागवणार आहांत वाटतं ?

**श्रीधर**—काय बोलतेस त्याच्याशीं ?

**भगवंत**—हा हुकूम करतो आहे—हा तुझा लग्नाचा नवरा आहे वाटतं ?

**श्रीधर**—चूप—कुमारीकेसमोर कसं बोलावं एवढं तरी कळतं का ?

**भगवंत**—मी सॉलिसिटर आहें. मला सर्व कांहीं कळतं. तुझ्यासारखे पंधरा कारकून माझ्या ऑफिसांत आहेत.

**श्रीधर**—दुर्दैव बिचाऱ्यांचं !

**भगवंत**—तूं तरी कुठं मोठा सुदैवी आहेस ? मी काय—किंवा शंकरराव काय—नोकराला सारे धनी सारखेच.

**श्रीधर**—खरं आहे.

**भगवंत**—आहे ना ? ऐक लक्ष्मी, हा मला दुष्ट ठरवतो आणि तुझ्या पाशीं माझी तुलना करतो. तुला पटतं आहे का हें ?

**लक्ष्मी**—तुह्मांला मुलगी झाली ह्मणजे तिला विचारा हा प्रश्न.

**भगवंत**—तेव्हां तूंही विचारशील.

**लक्ष्मी**—मी ! ती कां ?

**भगवंत**—मुलगी असणार आपणा उभयतांची !

**श्रीधर**—बस्स ! स्त्रीजातीची कांहीं मर्यादा ठेवा !

**भगवंत**—मर्यादा मला कशी कळेल ? मी कांहीं मधुकऱ्या नव्हतों.

**श्रीधर**—हिच्याच हातची मधुकरी खाऊन मीं जीव जगवला आहे. यांत नवीन काय सांगितलंत ? खरंच, तुह्मी सॉलिसिटर आहांत. वकील असतां तर बोलतांना एकदम इतका तोल सुटला नसता.

**भगवंत**०—आपल्या तोलाच्या माणसाशीं असल्या तोलाच्या गोष्टी बोलत जा. गांठ माझ्याशीं आहे हें ध्यानांत ठेव.

**श्रीधर**—लक्ष्मीला आई आहे हें तुह्मीही ध्यानांत ठेवा !

**भगवंत**—शंकररावांचं वचन आहे तोंपर्यंत तिच्या आईची मला मुळींच भीती वाटत नाहीं ( गिरिजा येते )

**गिरिजा**—असं का ?

**भगवंत**—( हंसून ) अहो तें नुसतं यांना सांगायचं. आतां असं पहा, हा लक्ष्मीचा हात धरूं लागला—

**गिरिजा**—एवढंच ना ? एका घरांत राहिलं कीं हाताला हात हा लागायचाच ! शिवाय आह्मी बायका आपखुषींनं कासाराच्या हातांत हात देतोंच कीं नाहीं. ?

**भगवंत**—हा कासार आहे का ?

**गिरिजा**—यांच्याच हातानं तिचा चुडा भरला जायचा असला तर ?

**भगवंत**—त्यावेळीं पाहतां येईल. पण एव्हांच त्यांनीं हिचा हात धरावा ?

**गिरिजा**—मी तिची आई आहेंना घरांत ? तुह्मी का उगाच जिवाचा अट्टाहास करून घेतां !

**भगवंत**—शंकररावांनीं मला वचन दिलं आहे.

**गिरिजा**—अर्ध्या वचनानं कामं होत नसतात. अजून माझं अर्धं वचन शिल्लक आहे.

**भगवंत**—पण तुह्मी तरी आपल्या पतीच्या अर्ध्या वचनाला राहतां ना ?

गिरिजा—हो ! माझं अर्धं वचन मिळविण्यासाठीं त्यांचं वचन मला अर्धं ठेवावं लागतं.—भगवंतराव, देवा घरच्या गांठी पडेपर्यंत उगीच माणसांची बडबड कशाला ? गाठ पडली ठका ठका ! याचें वर्म जाणे तुका ( टॉवेलानें हात पुशित शंकरराव येतो. )

शंकर—ओहोहो ! भगवंतराव ? या बसा ! अरे श्रीधर, त्यांना एक खुर्ची दे.

भगवंत—( श्रीधर खुर्ची देतो. तिच्यावर बसतांना हसत हसत बाजूला ) ही तुझी लायकी.

श्रीधर—( बाजूला ) मी जाणून आहें.

शंकर—अरे श्रीधर, आतां फराळाला जा पाहूं. आणि असं पहा लक्ष्मी, यांना चहा घेऊन ये. ( दोघे जातात ) ( गिरिजेला ) मला यांच्याशीं कांहीं खासगी बोलायचं आहे.

गिरिजा—मला न कळण्याजोगं ?

भगवंत—तुह्मांला कळूं न देण्याजोगं.

गिरिजा—( शंकररावांना ) असं का ?

शंकर—तसंच आहे असं कांहीं नाहीं. पण गेलीस तर त्यांत काय बिघडलं ?

गिरिजा—अं ! मी नाहीं जायची.

शंकर—बरं बुवा राहिलं. आतां काय म्हणतां भगवंतराव ?

भगवंत—उद्यां ऑफिसांतच बोलूं.

गिरिजा—मीही आहें उद्यां ऑफिसांत हजर.

भगवंत—उद्यांवर टाकूनही चालायचं नाहीं. उद्यांच पोलिंग डे आहे.

गिरिजा—असं ! इलेक्शनची भानगड आहे वाटतं ! तुम्ही उभे राहिलां आहांत ना ?

भगवंत—पण आतां अगदीं बसायच्या बेताला आलों आहें. पेस्तनजी चुनावाल्यानं मोठा जोर मारला आहे. यांची मदत नसली तर तो निवडून येणार खास.

**शंकर**—आणि तो तर निवडून येतां कामा नये.

**गिरिजा**—तो कां ?

**भगवंत**—त्याचीही असलीच फॅक्टरी आहे ना ? यांचा धंदा बसव-वण्यासाठीं निवडून येतांच यांच्या फॅक्टरीच्या जागीं रस्ता करण्याचा त्यानं घाट घातला आहे.

**गिरिजा**—मग तुम्हांला काय आहे अडचण ?

**भगवंत**—यानीं आपलीं, आपल्या मित्रांचीं आणि आपल्या नोकरांची मतं तिसऱ्याच गृहस्थाला कबूल केलीं आहेत.

**गिरिजा**—तीं यांना द्या.

**भगवंत**—पण त्याला माझी एक अट आहे.

**गिरिजा**—ती कोणती ?

**भगवंत**—तुमचंही मत मला पाहिजे आहे—इलेक्शनला नव्हे—लक्ष्मीच्या लग्नाला.

**गिरिजा**—इलेक्शनचा आणि लक्ष्मीच्या लग्नाचा काय संबंध ?

**भगवंत**—नाहीं तर मी withdraw करीन आणि चुनावाला निवडून येईल.

**शंकर**—चुनावाला निवडून आला कीं मी ठार बुडालोंच (लक्ष्मी येते.) लक्ष्मी, आपल्या भावी पतिराजांना चहा दे. (पडद्यांत—ठेव—लक्ष्मी तो पेला खालीं ठेव.)

**भगवंत**—अरे ! हा विठोबा (विठोबा येतो) काय विठोबा किती मतं गोळा झालीं ?

**विठोबा**—तो पेला खाली ठेव किंवा माझ्या ओठांना लाव. हं हं—पुढं ये—अशीच पुढं ये.

**शंकर**—लक्ष्मी, भगवंतरावांना—तुझ्या या भावी पतिराजांना चहा दे.

**विठोबा**—नको—नको—चारशें त्रेचाळीस मतं सांगतात कीं नको. तो चहा मला दे. भगवंतराव चारशें त्रेचाळीस मतं पाहिजेत कीं हा चहा पाहिजे ?



भगवंत--मला तुमचंही मत पाहिजे आहे.

भगवंत—दोन्ही पाहिजेत.

विठोबा—तें होणार नाहीं. कारण हा चहा—

पद—( न तडफ् फिराके )

दिसला चहा तुह्मांला । परि हा विषारि प्याला ॥
जहरी जवाहिराचा । सखिचा विषारि प्याला ॥ १ ॥
न पचे सुध्या मनाला । न पचे कुव्या जनाला ॥
'इष्के शराब प्याला ' । सखिचा विषारि प्याला ॥ २ ॥
दुनिया खुल्या दिलाची । किस्मत् भल्याबुऱ्याची ॥
जरबी भरी जिवाला । सखिचा विषारी प्याला ॥ ३ ॥

( श्रीधर येतो )

लक्ष्मी—आई देऊं कां ? ( गिरिजा खुणेनं होय म्हणते. लक्ष्मी श्रीधरला चहा देते. )

विठोबा—हाय ! नाहीं तुला- नाहीं मला—घाल त्या कुत्र्याला !

श्रीधर—काय झालं ? झालं काय ? या चहांत कांहीं विष आहे कीं काय ?

( पडदा पडतो ).

—:x:—

मराठी ग्रंथ संग्रहालय
ना.
ठाणे.

# अंक दुसरा.

स्थळ–श्रीधरपंतांची खोली.

( नारायणराव व बाबासाहेब )

**बाबासाहेब**–श्रीधरपंतांच्या गैरहजेरींत आपण इथं बसलों आहोंत. त्यांना बरं वाटेल ना हें ! आम्हांला अशा बाबतींत फार काळजी घ्यावी लागते. आमच्या कंपनीच्या बिऱ्हाडांत असं कांहीं चालायचं नाहीं. खुद्द मालकांना देखील माझ्या गैरहजेरींत मी माझ्या खोलींत बसूं देणार नाहीं.

**नारायण.**—अगदीं संकोच नको बरं. मी आणि श्रीधरपंत अगदीं एकच आहोंत असं समजा. ते देखील आतांच येतील, तोंपर्यंत तुम्हांला इथं बसवून घ्यायला सांगितलं आहे.

**बाबा.**–हें सगळं आज म्हणाल. पण उद्यां आमच्यावर एखादं कड्याळ घालाल. तुम्हां लोकांचा आधींच आम्हां नाटकवाल्यांवर अविश्वास. त्यांत मी मॅनेजर. मॅनेजर म्हटला म्हणजे सर्वांचाच त्याच्यावर दांत असतो. अहो नारायणराव, तुम्हांला माहीत नाहीं. आम्हाला अगदीं सरळ रस्ता असला तरी काट्यांतून चालल्यासारखं जपावं लागतं.

**नारायण.**–असं का ?

**बाबा.**—असं का ? वा ! अहो मॅनेजर आणि त्यांत नाटक मंडळीचा म्हणजे फार कठीण--फारच कठीण ! कांहीं उपमाच देतां यायची नाहीं. हें आतां नाटक घ्यायचं ठरवायचं म्हणजे माझ्या गळ्याला तांत आहे. आमच्या मालकांना तर त्यांत कांहीं कळत नाहीं. पण उद्यां आम्हीं घेतलं आणि फेल झालं कीं भरलीच आमची कंबक्ती. वाईट झालं कीं तें आमच्या मुळं--चांगलं झालं तर मालकांची कर्तबगारी. अशी आहे ही मॅनेजरकी. पण तुमचा आमचा घरोबा--एवढ्याच करतां हो म्हणतों आहें. जुनं नातं एकदम विसरून चालत नाहीं.

**नारायण.**–नातं कसलं आलं आहे त्यांत एकाकाळीं आम्हीं श्रीमंत होतों पण आज कुठं तरी पोट भरण्यासाठीं मला देखील चार पाट्याच उच-

लाव्या लोंगताहेत ना ? त्यावेळीं तुम्हीं आमचे आश्रित होतां पण आज आम्हांला तुमच्याकडेसच भिक्षा मागायची पाळी आली आहे. तुम्हीं आपुलकी धरता हा तुमचा मोठेपणा.

**बाबा**–तें खरं आहे. पण या आमच्या धंद्यापायीं आम्हाला वाटेल तें करावं लागतं. सज्जन व्हावं लागतं, तसं दुर्जनहि व्हावं लागतं. मोठा कठीण धंदा! अनुभवाशिवाय कळायचं नाहीं. बाहेरून तुम्हां लोकांना वाटतं कीं मोठं सुख–पण छे! छे! छे! छे! या मालकांशीं वागणं आणि हीं मालकं वागवणं–नको–नको.

**नारायण**–तुमचे मालक मोठे कडक आहेत वाटतं ?

**बाबा**–कडक असते तर फार फार बरं झालं असतं! पण कांहींच धरबंद नाहीं. आज ह्मणतील कशाला हें नाटक घेतां पण उद्यां हेंच नाटक एखाद्या दुसऱ्या कंपनीत बसवून पॉप्युलर झालं कीं म्हणतील कीं तुमच्या गाढवपणामुळें हें नाटक हातचं गेलं. मोठी कठीण नोकरी!

**नारायण**–तुह्मी आपल्या अंगावर कांहीं जोखीम घेऊं नका. नाटक पैसे देणार ही माझी खात्री आहे. पण–

**बाबा**–पण तुम्ही म्हणजे कांहीं मालक नव्हे. मालकांची खात्री झाली पाहिजे.

**नारायण**–ती कशी व्हायची ?

**बाबा**–ती कशी व्हायची ? हेंच तर कठीण आहेना! स्टेजवर आल्याशिवाय नाटकाची किंमत कळणार नाहीं–आणि किंमत कळल्याशिवाय स्टेजवर आणायचं नाहीं. आतां बोला.

**नारायण**–आमची किंमत तशी कांहीं मोठी नाहीं. तीन हजार रुपये–

**बाबा**–तीन हजार! या खाडिलकरांनीं हा घोळ घालून ठेवला आहे. जो उठला तो तीन हजार मागतो. जसे कांहीं सारेच बेटे खाडिलकर. बरं झालं कीं द्रौपदीला त्यांनीं दहा हजार घेतले नाहींत–नाहींतर तोच आंकडा टिचला जायचा. तीन हजार म्हणे तीन हजार. परसांतली भाजीच जशी कांहीं.

नारायण--तीन हजार म्हणजे तुम्हांला कांहीं फार नाहींत.

बाबा--अहो इथं कांहीं धर्मपोथी घातली आहे ? हवंतर कर्ज म्हणून मागा. धर्म म्हणून मागा--पण नाटकाला म्हणून एवढी मोठी रक्कम देणं आम्हांला शक्य नाहीं.

नारायण--मग कशाला थांबायचं ? एवढी रक्कम मिळत नसेल तर आम्हांला नाटक मुळीं द्यायचंच नाहीं. तुमचा आमचा घरोबा म्हणून तुह्मांला आधीं विचारलं. पण ते गोपाळराव चार हजार द्यायला कबूल आहेत.

बाबा--वैरच साधताहेत आमचं. थिएटर ठरवायला जा--कीं चढव-लंच भाडं. पात्र ठरवायला जा कीं चढवलाच त्याचा पगार. आतां हें नाटक !

नारायण--धंद्यांत चढाओढ चालायचीच. त्याला डरून कसं होणार !

बाबा--डरतो आहे कोण लेक ? मनगटाला मनगट घासून चालवला आहे कारभार. पण नारायणराव मी एक सांगतों तुह्मांला--तुमचा आंकडा फार मोठा आहे. ( श्रीधरपंत येतो ) या श्रीधरपंत. तुमच्या गैरहजेरींत आम्ही अगदीं at home होतों बरंका ! वारा छान येतो खोलींत ! काय भाडं देतां या खोलीचं ?


श्रीधर--कसली आपली गरिबीची जागा आहे. आपल्यासारख्या मोठ्या--बंगल्यांत राहणाऱ्या माणसांना नाहीं पसंत पडायची.

बाबा--थोड्या खर्चात थोड्या जागेंत तुम्हांला राहतां येतं हें पाहून मला आनंद वाटतो.

नारायण--हा तुमचा आनंद फार दिवस न टिकावा अशी निदान माझी तरी इच्छा आहे.

बाबा--म्हणजे ?

नारायण--म्हणजे एवढंच--जन्मभर थोड्या जागेंत आणि थोड्या खर्चात रहावं असं कधीं कुणाला वाटलं आहे ! त्यांतून तुमच्यासारख्याचं वैभव पाहिलं कीं आम्हा गरिबांच्या तोंडाला पाणी सुटूं लागतं.



श्रीधर—आधीं नाटक ऐका मग आपण पुढल्या गोष्टी बोलूं.

**बाबा**—अहो कसलं वैभव घेऊन बसला आहांत! एक मुक्काम पडला कीं—जाऊं द्या. नाटकाचं काय? तुम्हांला पैशाची जरूरी आहे—आम्हांला नवाखेळ पाहिजे आहे. याच्यामधून काय तें ठरलं पाहिजे.

**श्रीधर**—असं करा आधीं नाटक ऐका. मग आपण पुढल्या गोष्टी बोलूं.

**बाबा**—असले मुळमुळीत बेत आम्हांला आवडत नाहींत. आधीं आंकडा ठरल्याशिवाय नाटक ऐकून काय करायचं! उद्यां तुमचं आमचं पटलं नाहीं तर तुम्हींच ओरडत सुटाल कीं आम्हीं तुमचा प्लाट चोरला.

**श्रीधर**—तसं मी केव्हांही म्हणणार नाहीं असं वचन देतों हव तर!

**बाबा**—आम्हीं कुणाच्या वचनावर विश्वास ठेवीत नाहीं. आमच्या वचनावर कोण कुठं विश्वास ठेवतो आहे? आरंभालाच स्पष्ट स्पष्ट झालेलं बरं.

**श्रीधर**—मी चंचल मनाचा आहें असा मुळींच समज करून घेऊं नका!

**बाबा**—तुम्हीं चंचल नसाल पण लक्ष्मी चंचल आहे. उद्यां उत्पन्नाचे आंकडे पाहलेत कीं डोळे फाडूं लागाल. तें कांहीं नाहीं आधीं आंकडा ठरवा.

**नारायण**—बाबासाहेबांचं म्हणणं खरं आहे. आधीं आपण आंकडाच ठरवूं. असं पहा बाबासाहेब मीं आमचा आंकडा तुम्हांला आधींच सांगितला आहे. त्याच्याखालीं येणं आम्हांला शक्य नाहीं. मग आमचं नाटक पडून राहिलं तरी चालेल.

**श्रीधर**—किती सांगितला आंकडा?

**नारायण**—या बाबतींत तुला बोलायचं कारण नाहीं. तुला हें कांहीं जमायचं नाहीं.

**बाबा**—म्हणजे आम्हांला बनवायचा विचार आहे वाटतं तुमचा? ध्यानांत ठेवा मी मॅनेजर आहें. सर्वांना आम्हीं बनवतों पण आम्हांला कुणी बनवूं शकत नाहीं. आह्मांला बनवणारा फक्त एकच—

**नारायण**—कोण परमेश्वर !

**बाबा**—छे ! आमचे मालक ! ते आह्मांला बनवतात—मॅनेजर बनवतात वेळीं गाढवही बनवतात. काय वाटेल तें बनवतात.

**नारायण**—तर मग तुमच्या मालकांशींच बोलूं काय तें.

**बाबा**—शक्य नाहीं. आमचा उच्चार तोच आमच्या मालकांचा विचार. त्यांना स्वतंत्र अशी भाषाच कांहीं असत नाहीं.

**श्रीधर**—असल्या घासाघिशीचा मला अगदीं तिटकारा आहे. काय बोलायचं तें बोला तरी एक–किंवा स्पष्ट नाटक नको ह्मणून सांगा तरी एक.

**बाबा**—आह्मीं अडलों आहोंत. आह्मांला नवाखेळ पाहिजे आहे. बोलाल तें ऐकून घ्यावं लागतं एवढ्यासाठीं. प्रत्यक्ष पोलिस कमिशनरला देखील दाद देत नसतों आह्मीं. पण तुह्मां लेखकांसाठीं पडतं घ्यावं लागतं. तें कां ? तुमच्या कल्याणासाठीं. खरं ह्मणाल तर आह्मांला नाटकांना कांहीं तोटा नाहीं पण तुह्मीं गरजू आहांत आह्मीही गरजू आहोंत –हो–आहोंतच मग नाकबूल कशाला करा ? ( भगवंतराव येतो )

**भगवंत**—श्रीधरपंत इथं राहतात का ? ओह्हो ! गुड् डे, गुड् डे ! मिस्टर श्रीधरपंत.

**श्रीधर**—मी यावेळीं जरा कामांत आहें. विशेष कांहीं काम आहे का ?

**भगवंत**—तसंच महत्त्वाचं काम असल्याशिवाय का मी इथपर्यंत मुद्दाम येईन ?

**श्रीधर**—मला ही जरा आश्चर्यच वाटलं—

**बाबा**–मी पुन्हा येईन पाहिजे तर. माझंहि जरा निकडीचं काम आहे.

**नारायण**—जरा थांबाना. आंकड्याच काय तें. कायम करून मग जा.

**भगवंत**—ओहो ! नारायणराव तुह्मींहि इथच आहांत. तुमचीच भेट मला पाहिजे होती. योगायोग आहे खरा.

( त्याचा हात वळेंच धरून शेकहँड करतो )

**बाबा**—जातोंच मीं. अर्ध्या पाऊण तासानं पुन्हा येतोंच पहा. अगदीं नक्की ! ( जातो. )

**नारायण**—मुद्याची बात्र येतांच कसा बेट्यानं पळ काढला ? पाहलंस श्रीधर !

**भगवंत**—I pity you आय् पिटी यू. मिस्टर श्रीघरपंत. या नाटक्यांशीं संबध ठेवता ! Really, I pity you रिअली आय् पिटी यू.

**श्रीधर**—आपल्याशीं आमचा संबंध येतोच कीं नाहीं ? त्याबद्दल आह्मी कधीं तक्रार केली आहे.

**भगवंत**—ह्मणजे हे नाटकी आणि आह्मी सॉलिसिटर सारखेच !

**श्रीधर**—छे ! छे ! असं कुठं मी म्हटलं ?

**भगवंत**—There you are देअर यू आर.

**श्रीधर**—ते आपल्यापेक्षां फार प्रामाणिक, तोंडाला रंग लावून थाळी पिटून अभिनय करतात; आपण प्रतिष्ठित म्हणवतां आणि रंग न लावतां दुसऱ्याच्या तोंडाला काळं फासण्याइतकं खोटं बोलत असतां.

**भगवंत**—फारच विनोदी स्वभाव तुमचा. सुभाषिताशिवाय मजा नाहीं खरी. बोलण्यांत खोंच पाहिजे. उत्तम साधली आहे ही कला तुह्मांला.

**नारायण**—काय आहे आपलं काम ?

**भगवंत**—हें पहा असे एकदम कुऱ्यांत येऊं नका. मी मुद्दाम तुमच्या या खोलींत आलों यावरून तुमच्या समोर मी पड खाल्ली आहे. Let us be friends.

**नारायण**—You fiend यू फेंड.

**भगवंत**—असे शिव्यागाळी देऊं नका. इतकं नाक मुरडायला मी कांहीं एकादा गलित कुष्टाचा रोगी नव्हे. नारायणराव, तुमच्याकडे बोलायचं तें आधीं आटोपून घेतों. श्रीधरपंतांशीं एकांतांत बोलायचं आहे.

**श्रीधर**—नारायणराव माझे अंतरंग मित्र आहेत.

**भगवंत**—अंतरंगांत देखील असा एक कोंपरा असतो कीं तिथं जिवांचा बिवलग कुणीच होऊं शकत नाहीं. मित्राची जागा सुद्धां या

कोपऱ्याबाहेरच असते. जाऊं द्या-नारायणराव तुम्ही यांचे दोस्त आहांत, श्रीधरपंतांचं कल्याण शंकररावांच्या कल्याणावर अवलंबून आहे-आणि शंकररावांचं सर्वस्व आज तुम्हां आम्हां दोघांच्या हातीं आहे. ( थांबतो )

**नारायण**—थांबलांत कां ? पुढं बोलाना ?

**भगवंत**—नारायणराव तुमचीं आणि तुमच्या मित्रांचा मतं मला पाहिजे आहेत. शंकररावांच्या कल्याणासाठीं तुम्हीं पुढं आलं पाहिजे. पेस्तनजी चुनावाला निवडून आला तर शंकररावांच्या फॅक्टरीचा चुना होईल.

**नारायण**—तुम्हींच निवडून आलांत तर त्यांचं कल्याण होईल याची हमी कोण देणार ?

**भगवंत**—माझं वचन हीच माझी हमी.

**नारायण**—पुढं बदललां तर ?

**भगवंत**—असं होणंच शक्य नाहीं; शंकररावांच्या हितावर माझं हित अवलंबून आहे.

**श्रीधर**—सारा स्वार्थाचा बाजारः—

( नारायणराव व भगवंतराव आपसांत कुजबुजूं लागतात. )

पद—शंकरा—त्रिवट ( सोजा नुहिआ आवे )

**कोणा कुणि ना जाणे । स्वार्थ सारा ॥**
**स्वपर-भावीं वृत्ति न राहि ॥**
**फसवि युज्या फसविती अपणा ॥**
**वमे जीव न साही ॥ १ ॥**

**भगवंत**—आतां झालं ना तुमचं समाधान ?

**नारायण**—तुमचीं कारणं सयुक्तिक आहेत-पण पूर्वापार संबंध पाहिले कीं मन साशंक होऊं लागतं.

**भगवंत**—मी तुम्हांला खात्रीपूर्वक सांगतों-कार्पोरेशनमध्यें निवडून आल्यावर तुम्हांला माझा अनुभव फार निराळाच येईल. गरिबांच्या हिता· साठीं काय केलं पाहिजे हें आम्हां वकील सॉलिसिटरांना जितकं कळतं

तितकं इतरांना कळणारच नाहीं. गरीब आणि श्रीमंत दोघेहि आमच्याजवळ सारखेच आहेत. दोघानांही आमची जरूरी आहे. दोघांचीही आह्मांला जरूरी आहे. मी तुह्मांला बजावून सांगतों कीं त्यावेळीं तुह्मीं माझं नांव फार मोठ्या जागीं ठेवाल.

**नारायण**—काय श्रीधर ? तुझं काय मत आहे ? तुझं व्होट कुणाला देणार ?

**श्रीधर**—मी कुणालाच मत देणार नाहीं. शिवाय यांच्या बोर्डात मी नाहीं.

**नारायण**—मी काय करूं ?

**श्रीधर**—तुला योग्य वाटेल तें कर !

**भगवंत**—That's it दॅट्स् इट् ! किती सरळ सल्ला आहे. नारायण राव—ही प्रत्यक्ष संमतिच नाहीं असं कोण ह्मणेल ? श्रीधरपंतावर माझा पूर्ण-विश्वास आहे. ते केव्हांहीं माझ्या विरुद्ध जाणार नाहींत. विठोबाच्या आटोक्यांतलीं सारीं मतं मला मिळालीं आहेत—हीं एवढीं मिळालीं कीं मी आलोंच.

**नारायण**—ठीक आहे.

**भगवंत**—( शेक हॅंड करून ) Thank you Thank you आतां नारायणराव आह्मांला जरा एकांत द्या.

**श्रीधर**—असेनात का ? माझं रहस्य असं कुठं कांहीं नाहीं. यांच्या-समोर बोलायला कांहींच हरकत नाहीं.

**नारायण**—कांहीं नको चालूं द्या तुमचं. मी जातो. असा अर्ध्या तासानं पुन्हा येईन. तितक्यांत बाबासाहेब मॅनेजरही येतील. (जातो)

**भगवंत**—श्रीधरपंत नाटकं विकून तुह्मी असे किती पैसे कमावणार आहांत ? तुह्मांला विलायतेला जायचं आहे ना ? तुमच्या विलायतेच्या प्रवासाचा खर्च मी सोसतों.

**श्रीधर**—तुम्ही ? आजच काय माझा एवढा कळवळा आला ? विलायतेला जाण्यासाठीं मी तळमळतों आहे हें आज कित्येक दिवस तुम्हांला माहीत आहे. आजपर्यंत माझीही तळमळ तुम्हां सर्वांच्या थट्टेचा विषय होऊन राहिली होती. आजच तुम्हांला असं कां वाटलं ?

**भगवंत**—सार्वजनिक कार्याला हात घातल्या दिवसापासून मतं मिळण्यासाठीं फिरतांना निरनिराळ्या परिस्थितींतील व्यक्तींशीं माझा संबंध आला. गरिबाची महत्त्वाकांक्षा आणि परिस्थितीची कुचंबणा पाहून माझ्या श्रीमंतीची मला लाज वाटूं लागली. माझी पूर्वींची बुद्धी पालटूं लागली. पापांच्या गतस्मृतीच्या क्षालनासाठीं थोडं तरी प्रायश्चित्त करावं असं मनांत येऊं लागलं. शुभस्य शीघ्रम् या न्यायानं मी पहिल्यानंच तुमच्याकडे धांव घेतली. किती रक्कम पाहिजे तुम्हांला ?—कां बोलत कां नाहीं ?–कांहीं संकोच धरूं नका. किती रक्कम पाहिजे तुम्हांला ?

**श्रीधर**—विलायतेला जाऊन यशस्वी होऊन आलों तर तुमची रक्कम मी फेडूं शकेन–पण तिथंच मेलों तर–

**भगवंत**—असं भलतंच बोलूं नका. खुशाल जा. यशस्वी होऊन या. याउपर तुमचं कांहीं बरं वाईट झालं तर तेवढी रक्कम मला मिळालीच नव्हती असं मी समजेन.

**श्रीधर**—माझ्या नाटकाचे कांहीं तरी पैसे मला मिळतीलच—

**भगवंत**—नाटक बसून रंगभूमीवर येईपर्यंत तुम्हांला कंपनी तरी काय देऊं शकणार ? तोपर्यंत सोय असून तुम्ही थांबणार आहांत ?

**श्रीधर**—स्वतःच्या कमाईचे चार पैसे तरी जवळ असावेत अशी माझी फार मोठी महत्त्वाकांक्षा आहे.

**भगवंत**—असे चारच पैसे बरोबर घ्या तर मग. किती पाहिजेत ? दहा हजार पुरतील ! पैसे मिळतांच निघायची तुमची तयारी आहे ! ( गिरिजा येते )

**गिरिजा**—कुठं चालले आहेत श्रीधरपंत ?

भगवंत—हें काय ? तुम्हीं इथं ?

गिरिजा—कां, येऊं नये कीं काय ? श्रीधरपंत कांहीं आम्हांला परके नाहींत.

श्रीधर०—खरंच–तुम्हीं इथं का ?

गिरिजा—म्हटलं पाहावं तुमची खोली कशी काय आहे. उद्यां माझी लक्ष्मी ज्या खोलींत राहणार ती खोली म्हटलें एकदां पाहून घ्यावी.

भगवंत—असल्या खोलींत येऊन पडण्याइतकी तुमची लक्ष्मी अभागी आहे असं तुम्हांला वाटलं तरी कसं ?

गिरिजा—खोलीच्या लांबीरुंदीवर माणसाच्या भाग्याचं क्षेत्रमापन कांहीं करतां यायचं नाहीं. ऋषीमुनी पर्णकुटींत राहात असत, ते कांहीं दुर्भागी नव्हते.

पद—( अब तो हर अंदाज )

मुग्ध लतिका पुष्पयुक्ता देइ शोभा जी वना । काय गमते वन्य म्हणुनी हाय ! हीना जीवना ॥ धृ० ॥ सुंदरांगी केंवि ललना होइ दीना वल्कलें ॥ सुगुण सुचवी ही विविधता देइ सत्ता जीवना ॥ १ ॥

भगवंत—काव्यमय कल्पनांनीं कांहीं वैभवाची आवड पुरवली जात नाहीं. त्यांतून वैभवांत जन्म घेतलेल्या तरुणीला तरी असलं भेसूर दारिद्र्य केव्हांही आकर्षक वाटणार नाहीं.

गिरिजा—मग तुमचं आकर्षण या जागीं होण्याइतका असला कुठला लोहचुंबक इथं आहे ?

भगवंत—श्रीधरपंतांकडे माझं कांहीं खासगी काम होतं. कां, श्रीधरपंत, बाईसाहेबांना सत्काराचे दोन औपचारिक शब्दसुद्धां बोलायचे नाहींत वाटतं?

श्रीधर—बोलायचं तें मनःपूर्वक बोलावं. औपचारिक भाषणाचा मला अगदीं तिटकारा आहे.

गिरिजा—माझा कसला सत्कार करायचा ? श्रीधरपंतांकडे आम्हीं कधीं परकीपणानं पाहिलं नाहीं. म्हणूनच ना मी आतां इथं आलें ? पण मला

राहून राहून आश्चर्य वाटतं तें हेंच कीं, भगवंतरावांसारखीं मोठीं माणसं या गरिबाच्या अंधारकोठडींत पाऊल कशीं टाकूं लागलीं ?

**भगवंत**—हा आपला सहज योगायोग जमून आला. यांचे मित्र नारायणराव इथं आल्याचं कळलं, त्यांचीं मतं मला पाहिजे होतीं. इथं आलों आण पाहिलं तो एक नाटक्या इथं—नाटक्या वरं—नाटकवाला. मला नव्हतं वाटलं कीं, श्रीधरपंत असल्या लोकांशीं संबंध ठेवीत असतील म्हणून.

**गिरिजा**—नाटकच लिहिलं आहे त्यांनीं. आतां संबंध आल्याखेरीज कसा राहील ?

**भगवंत**—पण घरीं ? सभ्य माणसाच्या घरीं नाटक्या ? शहारे येतात आपल्या अंगावर !

**श्रीधर**—तुलना करून दाखवण्याचा प्रसंग पुन्हां कशाला आणतां ? आतांच्या तुमच्या उपकारामुळं तुमच्याविरुद्ध कटु शब्द बोलण्याचं माझ्या जिवावर येईल.

**गिरिजा**—उपकार ? कसले उपकार ? भगवंतरावांच्या उपकारांत श्रीधरपंत ?

**श्रीधर**—मला विलायतेला पाठवण्याचा सर्व भार यांनीं आपल्या शिरावर घेतला आहे. बाईसाहेब, या अनपेक्षित उपकारामुळं मी अगदीं थिजून गेलों आहें. आजपर्यंत निष्कारण मी यांच्याशीं तेढ्या धोरणानं वागत आलों असं आतां मला वाटूं लागलं आहे.

**गिरिजा**—भगवंतराव, खरं कां हें ?

**भगवंत**—कशाला मला लाजवतां उगीच ?

**गिरिजा**—हा विनय आहे तुमचा ! पण मला नाहीं खरं वाटत !

**श्रीधर**—अगदीं अक्षरशः खरं आहे. इतकी उदार कृती मला वाटतं यांच्याकरवीं ही पहिलीच.

**गिरिजा**—श्रीधरपंत, आजपर्यंत तुम्हांला मी माझ्या मुलासारखं मानलं. दुसऱ्याकडूनच पैसे घ्यायचे होते तर मी कांहीं मेलें नव्हतें.

भगवंत—पण शंकररावांना असला बेत केव्हांही पटणार नाहीं. मला वाटतं श्रीधरपंतांनाही असंच वाटलं असावं !

गिरिजा—तिकडे नाहीं पटणार कदाचित. पण माझं स्वतःच असं म्हणायला माझ्याजवळ कांहींच कां स्त्रीधन नाहीं ? श्रीधरपंतांवर तसंच संकट आलं असतं तर नाकांतली नथ सुद्धां मी विकली असती. पण मला वाटलं होतं कीं श्रीधरपंत दुसऱ्याच्या कृपेवर विलायतची सफर करणार नाहींत.

श्रीधर—असा माझा निर्धार होता खरा.

गिरिजा — मग तो कां डळमळला !

श्रीधर—पुरेशी रक्कम मिळण्याची आशा दुरावल्यामुळं. तात्कालिक इच्छापूर्तीची सजावट आयतीच चालून यावी, हें आमिष कांहीं लहान नाहीं.

गिरिजा—भगवंतरावांची छाया पडली वाटतं ? माझ्या परिचयाच्या श्रीधरच्या तोंडून असे स्वार्थी आळशाला शोभणारे उद्गार येतील असं मला केव्हांही वाटलं नसतं. किती रुपये पाहिजे आहेत तुम्हांला ?

श्रीधर—तुमच्या पैशांवर विलायतेला गेलों तर तुम्हीं मला विकत घेतलंसं होईल.

गिरिजा—आणि भगवंतरावांच्या पैशांवर गेलांत तर ?

श्रीधर— विलायतेहून येतांच मी त्यांचं कर्ज फेडून टाकीन अशी मला धमक आहे.

गिरजा—माझंहि कर्ज फेडतां येईल.

श्रीधर—नाहीं. तुमच्या ऋणांतून मला केव्हांही मुक्त होतां येणार नाहीं. पैशाच्या परत फेडीनं तुमचं ऋण मला फेडतां येणार नाहीं. भगवंतरावांच्या पैशांचं व्याज दिलं कीं, मी ऋणमुक्त होईन. तुमचं ऋण निर्व्याज आहे. तसं यांचं नाहीं.

भगवंत—छे ! छे ! असं म्हणू नका. लक्ष्मीशीं लग्न लागल्यावर माझं ऋण यांच्या इतकंच निर्व्याज होईल.

श्रीधर—लक्ष्मीशीं लग्न ! भगवंतराव, तुम्ही मला विकत घेऊं पाहतां आहांत काय ?

**भगवंत**—लक्ष्मीचा धर्मबंधु मला माझ्या बंधुसारखाच—

**गिरिजा**—ऐका श्रीधरपंत—आतां कळलं ?

**श्रीधर**—लक्ष्मीच्या पाणिग्रहणाची किंमत रुपये दहा हजार ! माझा कांटा वाटेंतून काढण्यासाठीं दहा हजार रुपये खर्चून मला विलायतेला पाठविणार होतां का ? बाईसाहेब, मला क्षमा करा. अधुऱ्या आशाळभूतपणाला बळी पडून माझा आत्मविश्वास मी या दुर्जनाला विकणार होतों. तुम्हीं येऊन मला सावध केलं नसतं तर या तात्कालिक मोहाला मी बळी पडलों असतों. बाळपणापासून हृदयांत वाळगलेली अत्यंत आवडती वस्तू गमावून विलायती श्रीमंती मिळविलेला एक कर्मदरिद्री भिकारी बनलों असतोः—

पद—अडाणा-त्रिताल ( छेला देवु छेल )

**दैवा दापितां जरी हें मन भ्यालें । वसुधा विशाला मला गृहशी**
**वाटे मानी मता ॥ धृ० ॥ असल्या विकासें । मन हांसे ।**
**जडता येतां विफलाश जीवा वरि दीनता ॥ १ ॥**

**भगवंत**—एकूण माझी ऑफर तुम्ही नाकारलीत म्हणायची ?

**श्रीधर**—कुणाचे उपकार मला नको आहेत. तुमचे अप्रेमाचे तर नकोतच, पण यांचें आईच्या प्रेमानं होणारे उपकारही मला नको आहेत. लक्ष्मीच्या कालच्या भाषणानं घटकाभर मला भुरळ पडली आणि तुम्हांला होकार द्यायला मी तयार झालों, याची मला अत्यंत लाज वाटते. वेहेत्तर आहे लक्ष्मीनं मला झिडकारलं तर—पण यापुढं पुरुषार्थाचा पराक्रम मी कालत्रयींही गमावून बसणार नाहीं.

**विठोबा**—( प्रवेश करून ) पुरुषार्थाच्या परमेश्वरा, मी तुला अभिवादन करतों. वैभवाच्या भव्य भवनांत भ्रमण भरारणाऱ्या भगवती स्वरूपा, वाङ्मयासाठीं या गोमयांत कां आपलं आगमन झालं ! भव्य भवितव्यतेच्या भगवंता, पांचशें पंचावन्न मतं पोलिंग पर्वणीला पछाडून पडलीं हें तुमच्या पंचीष्यार पंचप्राणाच्या प्रपंचाला अजून पचलं नाहीं कां ?

**भगवंत**—पांचशें पंचावन्न झालीं ? आता चुनावाल्याचा चुना होणार.

आणि श्रीधरपंत, गिरिजाबाई, लक्ष्मी माझी होणार. तुम्हां दोघांच्याही इच्छे-विरुद्ध लक्ष्मी माझी होणार. चल विठोबा पोलिंग स्टेशनवर. ( जातो. )

**विठोबा**—माझं काम संपलं, माझीं मतं संपलीं. तुम्हांला व्होटस् मिळालीं पण मी ओठांना मुकणार. हाय दुर्दैवा! स्फूर्तिदेवते, काव्यनिनादाच्या घोर घर्षणानं हृदयतरंगांत तांडव करणाऱ्या तडिल्लतेला आतां कोणत्या ओंठा-साठीं आळवूं! लक्ष्मी--लक्ष्मी--प्रीतिदेवते.

पद—( नीचि नजरे हो गई. )

**प्रीति वज्रें या जिवाची काल घटिका दाटली ॥ रुद्ररूपा जीवनाची घोर झाटिका वाटली ॥ धृ० ॥ भंगलेल्या या दिलाच्या दौलतीला शोधितां ॥ प्रेमगंगा पार दर्या होउनीयां आटली ॥ १ ॥ 'दिल्रुबा हा या जिवाचा' छेडितां हो भस्मसात् ॥ राख त्याची कुदरतीची दिल्भरी उद्घाटली ॥ २ ॥**

**गिरिजा**—तुमचं काव्य ऐकलं कीं नाहीं म्हणजे मला एक प्रकारची तंद्राच लागून राहते. हे पहा, श्रीधरपंत सुद्धां कसे स्तंभित झाले आहेत.

**विठोबा**—स्फूर्तिदेवते, मी आतां काय करूं? कुणासाठीं काव्य करूं? कुणाच्या प्रेमानं हृदय तडाकून मरून जाऊं? कुणाच्या सौंदर्यरथाच्या केतना-वरून जिवाचं लिंबलोण उतरूं? कुणा भाग्यवतीच्या सौभाग्यावर माझ्या परात्पर प्रेमाच्या पक्व पंकजाची परिभाषा भारूं? बोला! बोला! मी आतां काय करूं?

**गिरिजा**—घरीं जा आणि एक विरहगीती लिहून आण.

**विठोबा**—घरीं जायला नको, ऐका—

गीत गातसे यमक गणांचें गाढव-गायन करी। गिरेची गौरगार वैखरी ॥ भयाण भगवंतानें भरली भास भूत-भू-भुरी। भरारी भ्रमणाची भास्वरी। लक्ष्मी लपली अलक्षलक्षीं ललिता लीलांबरी। लखमा लोपे लंकापुरी। वाटे ठोंबा होय विठोबा ठेल थकला दुरी। ठरावा ठरतां ठरला उरीं ॥

गिरिजा—पुरे झालं तुझं काव्य—

विठोबा—काव्य करूं नको तर काय करूं बाईसाहेब? माझ्या हातानं मीं माझ्या हृदयावर कुऱ्हाड घालून घेतली. भद्रामावशी आतां काय म्हणेल? विठोबा रखुमाईचा जोडा आतां कुठला जमेल? गिरिजाबाई, लक्ष्मी नाहीं तर नाहीं पण छबीवर प्रेम करण्याची तरी मला संधी द्या.

गिरिजा—एव्हांच कांहीं लक्ष्मीचं लग्न भगवंतरावांशीं होऊन गेलं नाहीं ना?

विठोबा—झालं नाहीं खरं, पण होणार. भगवंताची भविष्यवाणी माझ्या भोळ्या भवितव्यतेला भोंवणार. हाय! हाय! हृदया-विदीर्ण हो-विदीर्ण हो!

श्रीधर—या पान्‌चट माणसांचा तुम्हांला तिटकारा येत नाहीं?

विठोबा—ज्वलत्-जह्ााल ज्वालामुखी जवन-जवानं जहरला.

श्रीधर—पुष्कळ ऐकून घेतलं. इथनं चालता होतोस कीं नाहीं? (विठोबा दचकतो, टेबलाला धक्का लागून वरील नाटकाची हस्तलिखित चोपडी खालीं पडते, ती विठोबा उचलून वाचूं लागतो.) ठेव खालीं ती चोपडी, आंत महत्त्वाचे कागद आहेत. पाडशील कुठं तरी. दे इकडे ती चोपडी-गाढव!

विठोबा—मी कवी आहें-अपशब्दानं माझा अपमान होत नाहीं. गाढवाशीं माझी तुलना करून गाढवाचा उपमर्द करूं नकोस. (श्रीधरपंत त्याच्या हातांतली चोपडी काढून घेऊन त्याला बाहेर घालवूं लागतो.) अरे जातां जातां 'शिवास्ते पंथानाम्' तरी म्हण. (जातो, श्रीधरपंत चोपडी टेबलावरील कांहीं पुस्तकांखालीं ठेवतो, विठोबा खिडकींतून पाहातो.)

गिरिजा—काय वाटतं श्रीधरपंत!

श्रीधर—काय वाटायचं! इतका पुरावेशुद्ध मूर्खपणा पदरीं बांधला गेल्यावर आतां बोलायला तरी काय आधार राहिला आहे? आशाळभूतपणामुळं मी इतका आंधळा कसा झालों याचं माझं मलाच कौतुक वाटतं.

गिरिजा—काल जो माणुस तुमचा वाटेल तसा पाणउतारा करीत होता, तोच आज इतका प्रेमानं डवडवून कसा निघाला याचा तुम्हीं विचार केला

पाहिजे होता. घरीं चाललेलीं खलबतं ऐकलीं म्हणून तर मी इकडे निघून आलें. जर दुर्लक्ष झालं असतं तर मला वाटतं, या नीचानं तुम्हांला पाया-शुद्ध बांधून घेऊन खड्ड्यांत टाकलं असतं. तुम्हांला परदेशांत जायचं आहे. अशाच रीतीनं सर्वांशीं वागूं लागलांत तर परमुलुखांत काय प्रसंग ओढवून घ्याल याचं मला भय वाटतं.

**श्रीधर**—झाल्या चुकीनं आतां माझे डोळे पुरे उघडले. बाईसाहेब, या वेळीं मी कोणत्या शब्दानं आपले आभार मानूं हेंच मला कळत नाहीं.

**गिरिजा**—झटून उद्योगाला लागा. परावलंबी राहणाराला ईश्वर केव्हांच हात देत नाहीं हें ध्यानांत ठेवा.

पद—बागेसरी—एकताला.

**उदार गुणिं या अविरता सदा विलापितां ॥ सकल काजिं**
**समता अति धरितां । नच परिभव निरखुनि ॥ धृ० ॥**
**अपार बल अतुल काल । विजानिं वास विविध जाल ॥**
**सुख विभवा मनीं धरा तरिच विजय ॥ १ ॥**

( जाते. ) ( श्रीधर कपाळावर हात घेऊन ईझिचेअरवर स्वस्थ कांहीं वेळ पडून राहतो, इतक्यांत नारायणराव येतो. )

**नारायण**—मतं द्यायचीं केली बुवा एकदांची तयारी—कां ? असा स्वस्थ पडलास कां ! काय झालं ?

**श्रीधर**—काय झालं ? मूर्खपणाचा कळस झाला. मतं देऊन आलास का?

**नारायण**—कां द्यायला नको होतीं वाटतं ?

**श्रीधर**—भगवंतराव नुसता खाटीक आहे. माझा गळा कापण्याचा त्यानं सुंदर घाट घातला होता.

**नारायण**—असं आहे ? मग माझ्या वतीचं एकही मत त्याला मिळूं देत नाहीं. त्याच्याच मोटारींतून जाऊन त्याचा कसा गळा कापतों पहा.

**श्रीधर**—छे ! छे ! असं होतां कामा नये. भगवंतराव तर निवडून आले पाहिजेत. पण काय झालं पाहिजे ?—सांग नारायण काय झालें पाहिजे ?

सांग. माझं डोकं कसं फिरूं लागलं आहे. भगवंतराव न आले तर शंकररावांचा घात होईल. निवडून आले तर—काय सांगूं नारायण, माझा सत्यानाश होईल.

**नारायण**—मग मरूं दे शंकररावाला खुशाल.

**श्रीधर**—नाहीं—शंकररावांच्या अन्नावर मी वाढलों आहें. माझ्या सुखासाठीं त्यांचा बळी देणं म्हणजे कृतघ्नतेची परमावधि होईल—जा—मतांची भरपाई करून ये जा.

**नारायण**—पोलिंग स्टेशनावरून मी आतांच आलों. आतां फक्त माझ्या वतीच्या मतांवर सर्व कांहीं अवलंबून आहे. आतां मुळींच वेळ नाहीं. मताचा एकदां काय तो निश्चय कर आणि मला निर्वाणीचं एक काय तें सांग.

**श्रीधर**—काय सांगूं! नारायण कांहीं सुचत नाहीं रे. काय सांगूं? जा—असाच धावत जा. सारीं मतं भगवंतरावांनांच दे जा. ( नारायण जातो. ) दे--त्यालाच मतं दे. त्या सैतानालाच मतं दे. देवाला दया नाहीं. सैतानच पावतो कीं काय पाहूं आतां. अरे! खरोखरच हा गेला. ( श्रीधर घाईघाईनें जातो. छबी हळूच येऊन टेबलआड लपते. भद्रामावशी व चंपा प्रवेश करतात. )

**भद्रा**—चंपे, इकडे ये. ही पाहिलीस खोली. त्या कपाटाआड लपून बैस. आणि लक्ष्मी आली कीं अगदीं मी पढवल्याबरहुकूम काम बजाव. ( चंपा खोलींत जाते. भद्रा घाईघाईनें लपत निसटून जाते. छबी टेबलआडून ती गेल्याचें पाहून पुन्हां दचकून टेबलआड लपते. लक्ष्मी व श्रीधर प्रवेश रतात )

**श्रीधर**—लक्ष्मी, हा काय अविचार? माझ्या खोलींत या वेळीं एकटंच येणं तुला शोभत नाहीं. आल्या पावलीं परत जा कशी.

**लक्ष्मी**—कां परत जा?

**श्रीधर**—उगीच तुला कुणी इथं पाहिलं तर काय म्हणतील? माझ्या घरीं दुसरं कुणी माणूससुद्धां नाहीं. नारायणदेखील निघून गेला.

**लक्ष्मी**—दुसरं कुणी माणूस नाहीं अशी तुमची खात्री आहे का? नारायणराव गेले, कीं तुम्ही त्यांना घालवून दिलं?

**श्रीधर**—हो-मीं त्याला घालवून दिलं खरं. पण जाऊं नकोस म्हणून सांगायला खालीं गेलों होतों तों तूं भेटलीस—

**लक्ष्मी**—अस्सं! नारायणरावांना तर घालवून दिलंच; पण मलाही वर यायची बंदी करण्यासाठी खालीं धांवत आलां होतां वाटतं? मी कांहीं तुमची लग्नाची बायको नव्हतें--मला भ्यायचं कांहीं कारण नव्हतं.

**श्रीधर**—काय बोलते आहेस हें! आज सारं जगच फिरलं आहे का?

**लक्ष्मी**—ज्याची नियत फिरली असते त्याला जगच फिरल्यासारखं वाटतं. आधीं आपण चकरा खायच्या आणि मग घर फिरलं म्हणायचं, तशांतलंच हें आहे.

पद—(मेहरबां हो जायंगे)

**विसरला जो भावना। नुरे मनुजता त्या जना॥ हरपला जो**
**कामना। तया जगतिची लाज ना॥ धृ॥ प्राण गेला दान**
**केला ज्या जिवाला वाहिला॥ विसर त्याचा जाहला। कुणि**
**नर म्हणे त्या जना॥ १॥**

**श्रीधर**—लक्ष्मी, काय तें स्पष्ट बोल. माझा काय अपराध झाला?

**लक्ष्मी**—अपराध कसला व्हायचा? तुमचे तुम्ही वाटेल तसे वागायला मुखत्यार आहांत. कुणाचा जोरा चालणार आहे तुमच्यावर?

**श्रीधर**—तुझा--लक्ष्मी, तुझ्या समाधानासाठीं मी खाईत उडी घ्यायलाही तयार होईन.

**लक्ष्मी**—खात्रीनें खाईत उडी घ्याल. घेतलीच आहे म्हणानात! भद्राबाई आतां इथं कशाला आली होती?

**श्रीधर**—आतां मात्र कमाल झाली. भद्राबाई इथं कशाला येईल?

**लक्ष्मी**—तें तुम्हांलाच ठाऊक!

**श्रीधर**—आतां नारायणाखेरीज कुणीच इथं आलं नव्हतं.

**लक्ष्मी**—नारायणराव लुगडं केव्हांपासून नेसूं लागले ?

**श्रीधर**—असं ! बाईसाहेबांना जातांना पाहिलंस वाटतं ?

**लक्ष्मी**—कोण आई ? माझी आई मला ओळखतां येत नाहीं वाटतं ? आणि माझी आई इथं कशाला येईल.

**श्रीधर**—बाईसाहेब इथं आल्या होत्या आणि त्यांनीं एका मोठ्या संकटांतून मला वांचवलं.

**लक्ष्मी**—या संकटांतून आईच्या नांवावर वांचायचा प्रयत्न करतां आहांत एवढं मात्र खरं ! काय वाजलं त्या खोलींत ?

**श्रीधर**—खरंच, काय वाजलं त्या खोलींत ? बांगड्यांचा आवाज कां तो?

**लक्ष्मी**—माझ्याच बांगड्यांचा खोलींत प्रतिध्वनी झाला म्हणून म्हटलं नाहींत हें भाग्यच म्हणायचं. ( खोलीचें दार उघडते व आंत जाऊन चंपेला घेऊन बाहेर येते ) हे नारायणराव आहेत वाटतं ?

**श्रीधर**—बाई आपण कोण ? इथं कशा आलांत ?

**चंपा**—वाः बरेच आहांत की! म्हणजे माझी ओळखसुद्धां दाखवायची नाहीं ? एवढ्यासाठींच मला आंत लपून बसायला सांगितलं होतं वाटतं ?

**श्रीधर**—कुणीं लपून बसायला सांगितलं होतं ?

**चंपा**—कुणी ? वा ! म्हणजे आपण सांगायचं आणि कुणी म्हणून आपणच विचारायचं! बरा धंदा--नायकिणी झालों म्हणून आम्हीं कांहीं इतक्या ह्या झालों नाहींत. वा !

**लक्ष्मी**—आतां लपवा छपवी करण्याचा प्रयत्न करण्यांत काय अर्थ ? पाप चव्हाट्यावर आल्यावरसुद्धां त्यावर पांघरूण घालायचा प्रयत्न करणं वेडेपणाचं नाहीं कां ?

**चंपा**—पाप ? कसलं पाप ? प्रेमाला पाप म्हणणाऱ्या मेल्यांच्या तोंडांत किडे पडोत !

**लक्ष्मी**—बोलाना आतां ! दांतखिळी कां बसली ?

**श्रीधर**—काय बोलूं ? बाई, तुम्हीं असलं भलतं कुभांड माझ्यावर घालावं असा मी तुमचा काय गुन्हा केला होता ?

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं. ........
ता. ........
ठाणे.



लक्ष्मी—हे नारायणराव आहेत वाटतं ?

**चंपा**—कुभांड ? आतां काय बोलावं ? एवढ्या प्रेमाच्या आणा शपथा घेतल्या—आईचं मन मोडून मी तुमच्यासारख्या दरिद्री माणसाच्या नादीं लागलें ती अशी विश्वासघात करून घेण्यासाठीं कां ? वा !

**श्रीधर**—खरं सांगतों तुला लक्ष्मी, या बाईना मीं या जन्मांत यापूर्वी केव्हांही पाहिलं नाहीं.

**चंपा**—गेल्या जन्मींच्या गांठी म्हणून या जन्मीं संबंध आला असं आजपर्यंत तीन त्रिकाळ म्हणत आलांत आणि आतां—वाः !

**श्रीधर**—गेल्या जन्मीचं कांहीं वैर असेल खरं ! बाई, मेहरबानी करून इथून चालत्या व्हाल का ?

**लक्ष्मी**—कां ? छपवलेलीं आणखी कांहीं पापं बाहेर येतील अशी भीती वाटूं लागली का ? थांबा हो बाई--जाऊं नका. मी विचारतें तेवढं मला सांगा.

**चंपा**--वाः ! तुम्ही कोण मला विचारणाऱ्या ! मी माझ्या वल्लभा खेरीज इतर कुणाशींही बोलायची नाहीं. बोलायचंना गडे ? असं काय हें ? माझा अपराध झाला का ? मला आधीं कां नाहीं सांगितलंत ? मी कांहींच बोललें नसतें. बोलायचंना ? असं काय ?

**श्रीधर**--ही कोण धिंडका ? या लक्ष्मीसमोर उभं राहयला तुला अवदसेला शरम नाहीं वाटत ?

**चंपा**—असं उपरोधिक सांगण्यापेक्षां उघडच जा म्हणानात! मला नाहींहो वाईट वाटायचं. प्रेमाची बोली का मला समजत नाहीं? बोला फुलानं का कधीं कुणाला घाय पडले आहेत ? ही असेल तुमची कुणी. पण खरं प्रेम माझ्यावरच आहेना ? आहेना ? आहेना ? हें काय गडे ? वाः ?

**लक्ष्मी**—माझी अडचण होत असेल तर मी आपली जातें कशी. भद्रा मावशींना मी उगीच दोष दिला. डोळ्यांनीं प्रत्यक्ष पाहिलं तेव्हां—

**चंपा**—तेव्हां काय झालं ? कोण मेली ही अभद्र भद्रामावशी ? कुणी मेलीनं चुगली केली नी आमच्या प्रेमांत माती कालवली ? आणा तर मेलीला माझ्या समोर. झिंज्याच ओढून काढतें पहा. असं काय बरं ? गडे बोलायचं नाहीं का ?

लक्ष्मी—बोला ना–स्तब्ध कां राहिलांत ?

श्रीधर—लक्ष्मी, खरंच मला वेड लागलं तर नाहीं ? कोण ही बाई ? इथं कां आली ? माझ्यावर आळ कां घेते ? कीं हिलाच वेड लागलं आहे ?

चंपा—मलाच वेड लागलं आहे हो मलाच वेड लागलं आहे. तुमच्या प्रेमाच्या वेडानं भारून जाऊन जिवाचं रान केलं. साता जन्मींची पुण्याई प्रेमाच्या पाणवठ्यावर वाहिली आणि आतां हें असं बोलतां ? ( मोठ्यानें गळा काढून रडूं लागते. टेबलाआड असलेली छबी मोठ्यानें हसते. )

लक्ष्मी—कोण हंसलं ?

श्रीधर—खरंच कोण हंसलं ?

लक्ष्मी—किती जणींना आणखी कुठं कुठं लपवून ठेवलं आहे तें सांगून टाकाना एकदांच.

चंपा—अहो नाहीं. दुसरं कुणीं नाहीं. मींच रडत होतें ना ? तुम्हांला तें हंसल्यासारखं वाटलं असेल.

लक्ष्मी—रडण्या हंसण्यांतला भेद मला कळतो बरं ! पुरे झालं ! कुणी का असेना. एक पायरी घसरली कीं किती मजले म्हणून पाहायची काय जरूरी ?

पद—( सरसीरूहा नवा रामा )

**विटलें वचा गेला प्रेमा । असल्या गुणां नाहीं क्षमा ॥ धृ ॥**
**कुठला कुणाचा हा मोह पळभरी ॥ सहज गेला हृदयांतला ।**
**नाशी भ्रमा ॥ १ ॥**

आतां शेवटचं सांगतें. यापुढें कृपा करून माझ्या समोर येऊं नका. आणि प्रसंगविशेषीं यावं लागलंच तर भाषण मात्र करूं नका. बोलायचा प्रयत्न कराल तर अपमान करून घ्याल. (जाऊं लागते तोंच छबी पुढें येते.)

छबि—थांब ताई–

लक्ष्मी—कोण तूं ? तूंच हंसलीस वाटतं ती ? पाहिलीसना माझी विटंबना ? जा--आतां आईला सांग–शेजाऱ्यापाजाऱ्यांना सांग--साऱ्या जगांत डांगोरा पीट. भलत्याच्या भरी भरल्याचा परिणाम असाच व्हावयाचा.

छबि—आधीं माझं ऐकशील तर खरं !

लक्ष्मी—कुणाचं कांहीं ऐकायचं नाहीं मला. (तिला लोटून निघून जाते.)

चंपा—अहो थांबा बाई थांबा--( ती जाऊं लागते- )

श्रीधर—थांब खबरदार--बाई, ही दुष्टबुद्धि तुला कां झाली, त्याचा थोडासा उलगडा करशील का ?

चंपा—उलगडा कसला करायचा ? थांबा, मला लक्ष्मीबाईची समजूत घालूंद्या. हं दूर व्हा ! हातवीत धरायचा नाहीं बरं माझा. वाः ! ( जाते. )

छबि—श्रीधरभाऊ, आतां काय झालं तें मी तुम्हांला सांगतें.

श्रीधर—कांहीं ऐकायचं नाहीं मला. व्हायचं तें झालं. आतां पुढं काय ऐकायचं राहिलं आहे ?

छबि—अहो पण माझं जरा ऐकून तर घ्या. या कोड्याचा उलगडा मी करतें म्हणून म्हटलंना ? मी अगदी पूर्वीपासूनच इथं लपून बसलें होतें—

श्रीधर—जा—अशीच कुणा दुसऱ्याच्या खोलींत लपून बैस आणि त्याच्या जन्माचा सत्यानास कर. जा म्हणतोंना ? जा--नाहींतर बखोटीस धरून ओढून काढीन.

छबि—हिताची गोष्ट सांगायला आलें तर कुणीच माझं ऐकून घेत नाहीं का ? आतां मुळीं बोलतच नाहीं. कांहीं झालं तरी बोलायची नाहीं. बसा म्हणावं रडत. माझं काय एवढं तटलं आहे ? ( जाते. श्रीधरपंत खुर्चीवर पडून डोळ्यांना रुमाल लावून रडूं लागतो. इतक्यांत नारायणराव व बाबासाहेब येतात. )

नारायण—हें काय ? पुन्हा तेंच--आतां कां रडत बसला आहेस ? ऊठ हांस पाहूं एकदां तोंड भरून. हें पहा, बाबासाहेबांचं आमचं आकड्याचं पटलं बरं का. आतां फक्त पसंतीवर राहिलं. काढ चोपडी आणि वाचून दाखीव पाहूं.

श्रीधर—यावेळीं नाहीं माझं मन घेत. पुन्हा केव्हां तरी---उद्यां वाचूं.

बाबा—उद्यांबिद्यां आतां कांहीं नाहीं. ऐकायचं तर आतां. नाहींतर मुळींच नाहीं. now or never आम्हांला हो काय नाटकांना तोटा ? ऐशीं

चोपड्या पडून राहिल्या आहेत कंपनींत. आपला यांचा आमचा घरोबा म्हणून मी मालकांना न सांगतां हें धाडस करतों आहें.

**श्रीधर**—नारायण, यांना जाऊंदे आतां. कारण मग सांगतों तुला.

**बाबा**—मला ऐकायला येतं आहे. दाराला कान लावल्याशिवाय ऐकायची आम्हाला संवय असते. उगीच नाहीं एवढी मोठी कंपनी चालवीत. वाचायचं असलं तर वाचा. नाहींतर हा पहा चाललों, पुनः भाषा बंद !

**नारायण**—कारण कांहीं असो, आतां वाचून दाखवलंच पाहिजे. अशा संधी पुन्हा यायची नाहीं. काय बरं हें ? कसं तुला आपलं हित कळत नाहा ?


**श्रीधर**—( चोपडी उचलून घेतो. समोर घेऊन पाहतो. पानें मागपुढ चाळतो. ) कुणासाठीं आतां हें नाटक ? काय करायचं आहे मला आतां पैसे मिळवून ?

**बाबा**—पहिलंच वाक्य आहे वाटतं हें ? नान्दी घातलीत नाहीं वाटतं ?

**श्रीधर**—माझ्या जीवनाच्या भरतवाक्यालाच आज सुरवात झाली आहे. आतां कुठली नान्दी आणि कुठला प्रवेश ? नाहीं--नारायण--माझ्यानं आज वाचवणारच नाहीं ( चोपडी टेबलावर फेंकतों आणि दोन्ही हातांनीं डोळे झांकून ठेवतो. नारायणराव त्याच्याजवळ येऊन त्याचे हात दूर करूं लागतो. इतक्यांत खिडकींतून हात घालून कुणी तरी चोपडी लांबवतो. ) नको--नारायण, नको--नाहीं खपलं नाटक तरी चालेल. बाबासाहेब, तुम्हांला तसदी दिल्याची माफी करा. पुन्हां येणं शक्य असल्यास कदाचित् ऐकवीन--पण नाहींच माझं नाटक असं समजा. म्हणजे झालें.

**बाबा**—छान ! नारायणराव छान केलीत आमची. तुमच्या शब्दावर विश्वासून आम्हीं दुसरीं नाटकं आलेलीं हातची घालवलीं. आणि आतां हे असं म्हणतात. पैसे नको असले तर घेऊं नका म्हणावं पण आम्हांला नवा खेळ पाहिजे आहे. मालकांना कळलं तर मला जोड्यांनीं मारतील.

**नारायण**—असं काय श्रीधर--घे ती चोपडी आणि वाच पाहूं--ही घे. ( दचकतो. आणि चोपडी नाहीं असें दिसून येतांच टेबलावरील कागद धुंडाळतो. ) चोपडी काय झाली ?



शंकरराव — नाटकाच्या चोपडींत बॅंक ड्रॅफ्ट्स !

**श्रीधर**—म्हणजे ? ही मी अशीच फेंकली होती. ( पाहून ) चोपडी नाहीं. ही काय भुताटकी ? नारायण, चोपडी काय झाली ? चोपडी गेली तर माझा सत्यानाश होईल. त्याच चोपडींत माझे अत्यंत महत्त्वाचे कागद आहेत.

**नारायण**—छे ! कुठंच सांपडत नाहीं. खिडकींतून बाहेर गच्चीवर नाहीं ना पडली ? ( बाहेर जातो. श्रीधर तिथेंच शोधूं लागतो. )

**बाबा**—अहो हा काय फार्स चालला आहे ? द्यायचं नसलं तर नाहीं म्हणा. आम्हांला कळतात हीं नाटकं. आम्ही ही नाटकवालेच आहोंत. आम्हीही करतों असलीं ढोंगं !

**नारायण**—हातोहात चोपडी कशी नाहींशी झाली ?

**श्रीधर**—नारायण तुला कल्पना नाहीं. चोपडी गेली तर त्याची पर्वा नाहीं. आठ दिवसांत पुन्हा सारं नाटक लिहून काढीन. पण आंत दुसरे जे कागद होते— ( शंकरराव येतो. )

**शंकर**—श्रीधर सकाळीं ते बँक ड्रॅफ्ट्स् दिले होते ते दे पाहूं. काय, डोळे फाडून पाहतो आहेस काय ? आज रविवार म्हणून घरींच ठेवून देतों असं म्हणाला होतास ना ? बोल ना शंखा--पाहतोस काय असा भूत झपाटल्यासारखा ?

**श्रीधर**—काय बोलूं आतां ?

**शंकर**—म्हणजे हरवलेत कीं काय ? एवढ्या तंगड्या तोडीत तुझ्या त्या भिकार चाळींत आलों तो एवढ्यासाठींच का ? खालीं बीचॅप कंपनीचा मॅनेजर उभा राहिला आहे वाट पाहात, त्याला काय सांगूं आतां ?

**श्रीधर**—आतांच ही चोपडी हातांत घेतली होती. सहज उचलून पलीकडे ठेवली. पुन्हां पाहतों तों चोपडी नाहीं.

**शंकर**— मी तुला चोपडीची हकीगत विचारीत नाहीं. ड्रॅफ्ट्स काय झाले?

**श्रीधर**—त्या चोपडींत ड्रॅफ्ट्स् होते आणि माझ्या शोधाचे कागदही होते.

**शंकर**—चोपडींत ! नाटकाच्या चोपडींत ? नाटकाच्या चोपडींत बँक ड्रॅफ्टस ? गाढव--बेअक्कल--काय वाटलं तुला त्या कागदांबद्दल ? कचरा

वाटले? ऑफिसच्या तिजोरींत नेऊन ठेवायचे ते घरीं घेऊन आलास--आणि ठेवले कुठं--तर नाटकाच्या चोपडींत? नाटकाची चोपडी म्हणजे गोद्रेजची तिजोरीच जशी कांहीं! कीं खाल्लेस कुठं विकून? बरं आहे आज रविवार आहे म्हणून. बँका बंद आहेत. आत्तांच टेलिफोन देऊन सगळीं नाकेबंदी करून टाकतों. विलायतला जायचं आहे म्हणे. विलायतला जायची शिदोरी बांधित होतास वाटतं ही? कुठं आहेत ड्रॅफ्टस? मला आतां वेळ नाहीं.

**नारायण**:—रावसाहेब, श्रीधरपंतांची हकीगत खरी आहे. आपण आलांत त्या वेळीं मी चोपडीच शोधीत होतों.

**बाबा**:—तेव्हांच नाटकाची एवढी फिकीर नाहीं ती! भला डल्ला मार-लात! म्हणे नाहीं खपलं नाटक तरी चालेल—आतां काय नाटकाची पर्वा? किती रुपये होते रावसाहेब?

**शंकर**:—दहा हजार. बरं झालं कीं नोटा नव्हत्या.

**बाबा**:—दहा हजार? विलायतेची बेगमी केलीत बुवा! छान--येतों आतां--पुरे झालं तुमचं नाटक.

**शंकर**:—विलायतेची बेगमी केली! खरं आहे. नाटक लिहून दहा हजार रुपये मिळाले नसते. तेव्हां असा डल्ला मारायचा घाट घातलास काय गुलामा? पोलिसच्या ताब्यांत देतों आतां तुला.

**श्रीधर**:—माझा जीव घेऊन-जर आपलं समाधान होत असेल तर पिस्तूल आणून मला गोळी घाला. आतां जगून तरी काय करायचं आहे?

**शंकर**:—म्हणजे मी फांसावर लटकावं! अरे मधुकऱ्या, शेवटीं जाती-वर गेलास! भिकाऱ्याला सिंहासनावर बसवलं तरी शेवटीं अहल्लखच करा-यचा. ड्रॅफ्टस् होते एवढं बरं, तसं कांहीं प्रत्यक्ष नुकसान झालं नाहीं. पण नोटा असत्या तर आज माझा गळा कापला असतास. पूर्वींचं नातं ध्यानांत घेऊन एक वेळ गय करतों. पण यापुढं माझ्या घराची पायरी चढूं नकोस. ऑफिसांतून आजपासून तुला डिस्मिस् केला आहे. मधुकऱ्या तो मधु-कऱ्याच. (जातो)

**श्रीधर**—नारायण--नारायण--एकाच वेळीं एवढीं संकटं आजपर्यंत कुणावर कधीं आलीं होतीं का रे?

**नारायण**—आणखी काय झालं?

**श्रीधर**—काय सांगूं? कांहीं अपराध नसतां चोहींकडून माझ्यावर आज कशी आग पाखडली गेली हें तुला कोणत्या शब्दानं सांगूं?

**नारायण**—झालेली हकीगत मला नीट तपशीलवार सांग पाहूं.

**श्रीधर**—नाहीं--मला कांहीं सुचत नाहीं--बोलायला शब्दच राहिला नाहीं. असं वाटतं, गळ्याला फास लावून घेऊन आत्महत्या करावी. आतां कुणासाठीं जगायचं! प्रेमाचं स्थान गेलं--महत्त्वाकांक्षेचा शोध गेला--प्राणापेक्षांही मोटी अब्रू गेली--आतां जगायचं कशासाठीं?

**नारायण**—पण असं झालं काय तें तरी सांगशील?

**श्रीधर**—ऐक सांगतों—

(पडदा पडतो.)

# अंक ३ रा.

( चर्नीरोड गार्डन. भद्रा व भगवंतराव )

**भद्रा**—झालं ना आतां तुमच्या मनासारखं? मला किती कष्ट पडले याची तुम्हांला कल्पना यायची नाहीं. चंपेला किती पढवावं लागलं आणि काय काय करावं लागलं काय सांगू? एवढं सारं तुमच्यासाठीं बरं का. मोबदला द्याल--मीही घेईन--पण नुसत्या मोबदल्यासाठीं कुणाचं असलं काम कधींही केलं नसतं. खरंच सांगतें, भगवंतराव, मला त्या श्रीधरची फार दया आली. पण म्हटलं तुमचंही काम होतं आहे, अनायासं विठोबाचंही साधतं आहे. लक्ष्मीवर कीं नाहीं त्याचा अगदीं जीव आहे.

**भगवंत**—अस्सं? एकूण विठोबाच्या कळवळ्यासाठीं तुम्हीं एवढे कष्ट केलेत म्हणायचे.

**भद्रा**—असंच कांहीं नाहीं. पण अनायासें विठोबाचेंही इष्ट कार्य साधत होतं म्हणून आपला तेवढाच अधिक उत्साह वाटला. विठोबाचा तुमचा परिचय नाहीं. एकदां त्याचा परिचय करून देणार आहें.

**भगवंत**—परिचय नाहीं? कोण म्हणतं? विठोबा माझा जिवजान दोस्त. त्याच्याच खटपटीमुळं तर मी कॉर्पोरेशनमध्यें निवडून आलों.

**भद्रा**—तरीही मी म्हणतें कीं तुम्हांला विठोबाचा परिचय नाहीं. विठोबाला तुम्हीं नुसता बाहेरून पाहतां--अंतरंग पहात नाहीं. त्याचं हृदय काव्यामृतानं नुसतं डबडबलं आहे. जिकडे पाहतो तिकडे त्याला सौंदर्य दिसतं. तुम्हांला देखील तो सुंदर म्हणेल.

**भगवंत**—म्हणेल विठोबा काय वाटेल तें म्हणेल. पण मला सुंदर म्हणायचं तर लक्ष्मी त्याला कुरूप वाटली पाहिजे.

**भद्रा**—तसं नाहीं बरं. लक्ष्मीसाठीं तर तो जगला आहे.

**भगवंत**—आणि माझाही जीव लक्ष्मीवरच गुंतून राहिला आहे. ऐकलंत भद्राबाई, विठोबाला म्हणावं लक्ष्मीचं वेड डोक्यांतून काढून टाक. नाहींतर असलं डोकं ठेचायला मी केव्हांही मागं पुढं पाहणार नाहीं. मला जें पाहिजें तें मी मिळवतोंच मिळवतों. मात्र अशा वेळीं माझ्या मार्गांत आड येणाराला ढेंकणावरडासारखा चिरडून टाकीत असतों.

**भद्रा**—ही एक पंचाईतच आली म्हणायची. एका म्यानांत दोन सुऱ्या कशा राहायच्या ह्या ? भगवंतराव, श्रीधरला चिरडलात ना ? झालं— आतां माझ्या विठोबाला तेवढी लक्ष्मी मिळवून द्या.

**भगवंत**—श्रीधरला कां चिरडला, माहित आहे ? लक्ष्मीसाठीं श्रीधरला चिरडला.

**भद्रा**—असं का ? हें मला माहीत असतं तर—

**भगवंत**—तर काय माघार घेतली असती ?

**भद्रा**—अर्थात् घेतली असती. माझ्या विठोबापरतं या जगांत मला दुसरं काय आहे ?

**भगवंत**—नवऱ्याला वेड्याच्या दवाखान्यांत टाकून कुंटणखाना बसवणाऱ्या तुझ्यासारख्या वेसवेला विठोबाबद्दलच एवढा ओढा कां हा ?

**भद्रा**—अहो पोर नाहीं ना मला ? लांबच्या नात्याचा मुलगा. भाचाच होतो म्हणाना. पण पोरानं मला अगदीं वेड लावलं आहे. त्याच्यासाठीं तर हा सारा व्याप !

**भगवंत**—वाटेल तेवढा व्याप वाढीव त्याच्यासाठीं. पण माझ्या वाटेंत आड येईल त्याला मी केव्हांही क्षमा करीत नसतों हें ध्यानांत ठेव. आतांच मीं शंकररावांना इथं अॅपॉईंटमेंट करून बोलावलं आहे. आज काय तो सोक्ष मोक्ष करून घेणार. म्हाताऱ्याला असा एका चिमटींत धरून ठेवला आहे. नुसती बोटं रगडीन तर पीठ पाडून टाकीन.

**भद्रा**—म्हणजे माझ्या विठोबाविरुद्ध मीच जाऊं म्हणतां ?

**भगवंत**—हो--आणि तुझाही नायनाट करणं माझ्या हातीं आहे. हें विसरूं नकोस. श्रीधरचा तसा धुव्वा उडवल्याला आज तीन महिने झाले.

हायहाय करीत फिरतो आहे वेड्यासारखा. तशीच तुझी गत होईल. डोंगरीची हवा तुला अगदीं जवळ आहे हें विसरूं नकोस. आतां गप्प रहा. ते शंकरराव येताहेत. अगदीं माझ्या होला हो देत जा. समजलीस ? ( शंकरराव येतो. ) नमस्कार या बसा ( घड्याळ पाहून ) अगदीं बरोबर वेळेला आलांत.

**शंकर**—अपॉइंटमेंट म्हणजे अपॉइंटमेंट ! तिथं क्षमा नाहीं. माझं हें असं आहे--किती महत्त्वाचीं कामं होतीं पण ताडकन् फेंकून निघून आलों. म्हटलं आमच्या सॉलिसिटरसाहेबांची खोटी नको.

**भगवंत**—सॉलिसिटरचं नातं घरोब्याचं खरं--पण त्याच्याहीपेक्षां ज्यास्त घरोब्याचं नातं जोडावं असं माझ्या मनांत आहे. आपली पहिली बोली झाल्याला आतां सुमारें तीन महिने होत आले. मुहूर्तदेखील संपत आले. आतां किती लांबणीवर टाकणार हें लग्न ?

**शंकर**—काय करूं ? घरांतून परवानगी मिळत नाहीं.

**भगवंत**—कसली घरांतली परवानगी ? मुलगी तुम्ही कांहीं विकीत नाहीं खाटकाला. कांहीं भिकाऱ्याला देत नाहीं. माझ्यांत काय वैगुण्य तुम्हांला वाटतं ?

**शंकर**—मला कुठं काय वाटतं आहे ? पण ती ऐकत नाहीं ना ?

**भगवंत**—तिला विचारतां कां आधीं? (गिरजा येऊन आड उभी रहाते.)

**शंकर**—असं कसं होईल ? तिच्या संमतीशिवाय लक्ष्मीचं लग्न ठरवणं अशक्य आहे.

**भद्रा**—आणि गिरजाबाईची संमति मिळणं फार कठीण. त्या श्रीधरचा ओढा आहे ना त्यांना ?

**शंकर**—त्या हरामखोराचं नांव काढूं नका. भलभलते ढंग करीत होता म्हणतात. कशाला आपली जीभ विटाळा. त्याचं कर्म त्याच्याकडे. जसं करील तसं भरील. लक्ष्मीच स्वतां बोलत होती. तिनं स्वतांच्या डोळ्यांनीं पाहिलं म्हणे. श्रीधरचा ओढा फुकट आहे. तिनं काय वाटेल तें म्हटलं तरी श्रीधरचा संबंध आतां अशक्यच.

**भद्रा**—लक्ष्मीनं प्रत्यक्ष पाहिलं असतांही अजून त्यांचा श्रीधरकडे ओढा असावा आणि या असल्या मतावर आपण अवलंबून राहावं. एकेक आश्चर्य आहे झालं.

**शंकर**—अहो पण किती झालं तरी बायको आहे ना ती ?

**भगवंत**—एवढ्यासाठींच मी तुम्हांला इकडे बागेंत बोलावलं. म्हटलं मोकळेपणानं बोलायला त्यांची आडकाठी नको.

**शंकर**—कुठंही बोला. पण तिचं मत घेतल्याशिवाय मला कांहींच ठरवतां यायचं नाहीं.

**भगवंत**—यःकिश्चत बायकोच्या मताची एवढी पर्वा करतां ?

**गिरिजा**—( प्रवेश करून ) बायकोच्या मताची ज्याला पर्वा वाटत नाहीं, त्यानं घरीं बायको आणण्याचा अट्टाहास कां धरावा ! बायको म्हणजे कांहीं गुलाम नव्हे.

**भगवंत**—बरं झालं आलांत त्या. उगीच चुटपुटत्या भाषणावरून भलताच ग्रह करून घेऊं नका.

**गिरिजा**—चुटपुटत्या नाहीं. मघापासून आड राहून मी सारं कांहीं ऐकतें आहे. उगीच तुमच्या खलबतांत पुढं कां या म्हणून दूर राहिलें. पण म्हणताताना कीं चोरून ऐकण्याचा धंदा नी कानीं पडे आपलीच निंद. तसंच झाल.

**भद्रा**—ऐकलंत ? बरं झालं. आतां उगीच भीडभाड धरायला नको. तोंडासमोर बोलावल्या नसत्या अशा बऱ्याच गोष्टी मी तरी बोलून गेलें होतें खरी. एका अर्थी ठीक झालं. केव्हांतरी तुम्हांला ऐकवलंच पाहिजे होतें. पण मी म्हणतें, एवढं झाल्यावरसुद्धां श्रीधरकडे तुमचा ओढा कां ?

**गिरिजा**—श्रीधरचं कांहीं कां होईना. भगवंतरावांना माझी मुलगी द्यायची नाहीं.

**भगवंत**—कां द्यायची नाहीं ?

**गिरिजा**—माझी मर्जी.

**भगवंत**—पण माझी नाहीं तशी मर्जी.

**गिरिजा**—नसेल.

**शंकर**—नसेल म्हणून कसं चालणार? कारणं सांगितलीं पाहिजेत.

**गिरिजा**—वेळ आली म्हणजे कारणंही सांगेन.

**भगवंत**—आजच सांगून टाकाना काय तें.

**गिरिजा**—तुम्ही कोण मला सक्ती करणार?

**भगवंत**—तुमचा भावी जामात.

**गिरिजा**—वाटेल तसे मनचे मांडे खायला कुणीं कुणाला आडकाठी केली आहे?

**भगवंत**—मनचे मांडे कां? शंकररावांनीं मला तसं वचन दिलं आहे.

**गिरिजा**—मी नाहीं ना वचन दिलं?

**भगवंत**—तुम्हांलाही कबूल करणं भाग पडेल.

**गिरिजा**—म्हणजे मला धमकी देतांहांत वाटतं? धमकावणीनं स्नेह-संबंध जुळत नसतात. सक्तीच्या बोलींत प्रेम नसतं आणि प्रेमाशिवाय शरीरसंबंध जुळून येत नसतात.

**भगवंत**—शरीरसंबंध जुळवण्यांत प्रेमाची आवश्यकता विठोबासारख्या वेडप्याला वाटेल. माझी लग्नाची कल्पना फार वेगळी आहे. मला पत्नी पाहिजे आहे, ती सुंदर पाहिजे, तिचा बाप श्रीमंत पाहिजे, ती आपल्या बापाची एकुलती एक मुलगी असली पाहिजे आणि माझ्या श्रीमंतीला शोभेशी ढब आणण्याची तिच्या अंगीं पात्रता पाहिजे. या कसोटीला तुमची लक्ष्मी उतरते आणि म्हणूनच मी तिच्यासाठीं मागणी घालतों आहे.

**गिरिजा**—म्हणजे असंच कां म्हणाना—कीं, तुम्हांला एक मोटर पाहिजे आहे, तिची बॉडी चांगली असली पाहिजे—मेकर फर्स्ट क्लास पाहिजे, किंमत थोडी पडली पाहिजे आणि चालीला फार उत्तम असली पाहिजे, असंचना? मोटर विकत घेणें आणि बायको घरीं आणणं यांत तुम्हीं फारसा भेद ठेवलेला दिसत नाहीं.

**भगवंत**—वाटेल तर तसं म्हणा—पण आहे तें मत तुम्हांला स्पष्ट सांगून टाकलं. तें चुकीचं असलं तर मी तुम्हांला हात जोडून सांगेन कीं, माफ करा माझीं मतं मला बदलतां येत नाहींत.

**श्रीधर**—काय बोलतां आहांत हें ?

**भगवंत**—कायद्याची सल्ला घ्यायला तुम्हीं माझ्याकडे येतां त्या वेळीं मी यापेक्षां कांहीं निराळ्याच प्रकारानं बोलत असतों कां ?

**गिरिजा**—दोहोंची किंमत सारखीच का ?

**भगवंत**—माझ्या दृष्टीनं सारखीच आहे. लग्न म्हणजे काय आहे, एक कायमचं कॉंट्रॅक्ट ! पटलं तरी ठीक, न पटलं तरी ठीक. कसं बसं पुरं करायचं.

**गिरजा**—आपण जरा विचार कराल, तर मला वाटतें, हें मत आपल्याला बदलावं लागेल.

**भगवंत**—मी इतका कच्च्या दिलाचा माणस नाहीं. तसा असतों तर माझा धंदा मला करतांच आला नसता. तुमचे कवि प्रेमाचं नांव घेतील, स्मृतिकार पावित्र्याची ग्वाही देतील, गृहस्थ कौटुंबिक सुखाचा बडेजाव मिरवतील पण माझ्या मतांत एक रतिभरही फरक व्हायचा नाहीं.

**गिरिजा**—असल्या बिन काळजाच्या माणसाच्या हातीं माझी मुलगी देण्याइतकी मी कसाब नाहीं.

**भगवंत**—तुम्हांला कसाबही व्हावं लागेल.

**भद्रा**—गिरिजाबाई, ते सांगतात त्याचा भलताच अर्थ घेऊं नका. कुणी सरळ बोलतो त्याला फटकळ म्हणतात—काव्याच्या शब्दांत ऐकायला सारं गोड लागतं. वस्तुस्थिति कुठं असते तशी ? तारुण्य असतं तोपर्यंत सारे प्रेम प्रेम म्हणत सुस्कारे टाकतात पण थोडा अनुभव येतांच सारं प्रेम चुलींत जातें. अन्नाची भ्रांत झाली कीं प्रेमाचं प्रेत चुलींत जाळावं लागतं.

**गिरजा**—संपलं तुमचं व्याख्यान ? काय जरूर होती या व्याख्यानाची ? भगवंतरावांना कांहीं कुणी स्वैंपाकीण नको आहे. चार नोकर माणसं ठेवा-

यत्नी त्यांची ताकद आहे. खोलीच्या शोभेला जसं फर्निचर, श्रीमंतीच्या शोभेला जशी मोटर, घराच्या शोभेला जशी वांकडी कमान, तशीच यांच्या संसाराच्या शोभेसाठीं वाकणारी एक स्त्री जातीची बाहुली यांना पाहिजे आहे. माझी मुलगी तशी नाहीं. पटलं न पटलं तरी सारखंच वाटणारं काय-मचं कॉन्ट्रॅक्ट करण्याइतकी माझी मुलगी निर्जीव नाहीं. यांची बायको सुंदर आहे असं यांच्या शेजाऱ्यानं म्हटलं तर यांना धन्यता वाटेल. पण शेजाऱ्याच्या असल्या स्तुतीवर खूष होण्याइतकी माझी मुलगी बेअक्कल नाहीं. भगवंतराव, संसाराच्या प्रवासांत पावलाला पाऊल भिडवून चालणारा हृदयाचा सोबती माझ्या मुलीला पाहिजे आहे. सुखांत आणि दुःखांत हंसण्यारडण्याची साथ करणारा जिवाचा जिव्हाळा माझ्या मुलीला पाहिजे आहे. तुमच्या व्यवसाई बुद्धीशीं माझ्या तालमेंत वाढलेल्या माझ्या मुलीचीं मतं पटणार नाहींत. तुम्ही माझे जांवई झालांत तर तिच्या बिचारीच्या जन्माचं मातेरं होईल.

**भगवंत**—तुम्हां उभयतांचा संसार या कसोटीला उतरतो आहे का?

**शंकर**—अलबत्-आमच्याइतका सुखाचा संसार कुणाचाही झाला नसेल.

**भगवंत**—तुमचा अनुभव तुमच्यापाशीं, पण मला मात्र हें पटत नाहीं.

**शंकर**—कां पटत नाहीं?

**भगवंत**—पूर्वी कदाचित् तुमचीं मतं एकमेकांशीं पटत असतील पण आज प्रत्यक्ष तशीं पटल्याचा पुरावा दिसत नाहीं. मला जांवई करून घेण्यांत तुम्हांला आनंद आहे पण या तुमच्या आनंदाची वांटेकरीण होण्या-इतका चांगुलपणा--नव्हे माणुसपणा यांनीं दाखवला नाहीं.

**शंकर**—मला काय हवं तें वाटलं, तरी तिच्या समाधानासाठींच ना मी कबुली देत नव्हतों?

**भद्रा**—म्हणजे तुम्ही बायकोपुढं पड खातां, असं माझ्यासारख्या तिऱ्हाइताला वाटेल.

**शंकर**—हो बुवा, आपण पड खातों. आपल्याला त्यांत कांहीं लाज वाटत नाहीं.

**भद्रा**—म्हणजे तुमच्याकडे बायकोचा वरचष्मा आहे म्हणायचा !

**गिरिजा**—नाहीं. तशीच वेळ येते त्यावेळीं मीही पड खातें.

**भगवंत**—ती वेळ हीच आहे. पड खायची तर ती याच वेळीं. आज माझ्या लग्नाला जर तुम्हीं संमति दिली नाहीं तर काय प्रसंग ओढवेल याची कल्पना आहे का तुम्हांला ?

**गिरिजा**—काय प्रसंग ओढवणार आहे ?

**भगवंत**—तुमच्या हातांत नरोटी येईल.

**गिरिजा**—ती कशी ?

**भगवंत**—पडला तो भगवंतराव आणि निवडून आला तो चुनावाला असंच समजा.

**गिरिजा**—चुनावाल्यासारखा आमच्या कारखान्याचा सपाट रस्ता कराल?

**भगवंत**—अलबत् करीन.

**गिरिजा**—कां ?

**भगवंत**—माझ्या सूडासाठीं.

**गिरिजा**—या मुंबईच्या जनतेनं तुम्हांला कॉर्पोरेशनमध्यें निवडून दिलं तें खासगी सूड उगवण्यासाठीं का ?

**भगवंत**—हातीं अधिकार आला असतां त्याचा उपयोग करून न घेण्याइतका मी मूर्ख नाहीं.

**गिरिजा**—ही हकीगत मीं प्रसिद्ध केली तर ?

**भगवंत**—ती खोटी ठरवण्यासाठीं मी वाटेल ते पुरावे उभे करीन. पंचवीस लोक मला हलकट म्हणतात तिथं तुम्हीं सव्विसाव्या. मी सॉलिसिटर आहे हें तुम्ही विसरतां !

**गिरजा**—जनतेला दिलेल्या अभिवचनाची हीच का किंमत !

**भगवंत**—जनतेला काय कळतं आहे ? व्होटर्सचं काय ? इलेक्शनच्या वेळीं मत देतात आणि दुसरं इलेक्शन येईपर्यंत विसरून जातात. आम्ही होऊन त्यांच्या घरी जातों तेव्हांच आपल्याला मत आहे याची त्यांना आठवण येते. बहुतेक मतदार दरिद्रीच असतात. मोटार कसली असते हें त्यांना माहित नसतं. फुकट मोटारींत बसायच्या लालचीनं ते

आम्हांला निवडून देतात आणि पुढं त्यांची डर न धरतां आम्ही काय वाटेल तें करूं शकतों. पूर्वीं मी पायीं चालणारा होतों त्या वेळीं बेफाम मोटारवाल्यांना फासावर लटकवावं असं म्हणत होतों. आतां मीच मोटारवाला झालों, तेव्हां लोकांना रस्त्यानं चालतांच येत नाहीं हें मला कळून आलं. तुम्ही माझ्या जागीं या म्हणजे तुमचींही मतं अशींच होतील.

**गिरजा**—ऐकलं ? आतां काय वाटतं इकडे ?

**शंकर**—भगवंतराव तुम्ही इतक्या उलट्या काळजाचे असाल असं नव्हतं मला वाटलं ! स्वार्थानं मीं तुम्हांला निवडणुकीच्या वेळीं मदत केली खरी पण ती माझ्या मुलीच्या पाणीग्रहणाची किंमत होती असं मला त्या वेळीं वाटलं नव्हतं.

**भगवंत**—तसं मीं तुम्हांला वाटूं दिलंच नाहीं. माझं स्वरूप तुम्हांला दिसलं असतं तर त्यावेळीं तुम्हीं मला मदतच केली नसती.

**शंकर**—आतां दिसल्या नंतर माझी मुलगी तुम्हांला देण्याइतका मी नाहीं.

**भगवंत**—तसं करणं तुम्हांला भाग येईल.

**शंकर**—प्राण गेला तरी नाहीं.

**भगवंत**—प्राण न जातां हातीं नरोटी आली तरी ?

**गिरजा**—मुलीच्या नशिबाची नरोटी भाजून काढण्यापेक्षां आमच्या हातीं नरोटी आलेली चालेल. त्या नरोटींत भीक मागूं पण मुलीचं सौभाग्य साजरं करूं–समजलांत ? ऐकलं का ? उठायचं आतां. फराळाची वेळ झाली. घरीं गुंडू वाट पहात असेल.

**भगवंत**—शंकरराव हेंच का तुमचं शेवटचं उत्तर ?

**गिरजा**—हेंच आमचं शेवटचं उत्तर.

**भगवंत**—मला शंकररावाचं उत्तर पाहिजे आहे.

**गिरजा**—आम्हा उभयतांमध्यें दोन वाचा नाहींत. चलायचं ना ?

**शंकर**—भगवंतराव, मीं केव्हांही तुमच्या अकल्याणाची इच्छा धरली नाहीं. प्रत्येक वेळीं तुम्हांला मदतच केली आहे. तुम्हीही वेळोवेळीं माझ्या

उपयोगी पडलां आहांत. तुमच्या आमच्यांत वितुष्ट यावं अशी आमची इच्छा नाहीं. दुसरं काय वाटेल तें, मागा पण तुमच्या उपकाराच्या फेडीसाठीं मी केव्हांही माझ्या मुलीचा बळी देणार नाहीं ( गिरजा व शंकरराव जातात. )

**भद्रा**—कां--आतां स्वस्थ कां बसलांत ?

**भगवंत**—स्वस्थ कुठ बसलों आहें ? आतां तर माझ्या उद्योगाला सुरवात होणार. या उद्योगांत मला निदान तुझी मदत नको आहे. तुझ्याकडचं माझं काम संपलं. येतों रामराम.

( भगवंतराव जातो व चंपा येते. )

**भद्रा**—अहो जरा थांबा.

**चंपा**—कुणाला थांबायला सांगतां आहांत मावशीबाई ?

**भद्रा**—ते जाताहेत त्यांना--थांब--आधीं विचारूं दे मला.

**चंपा**—त्यांना विचारा सावकाशपणं. आधीं माझी बिदागी द्या. तीन महिने झाले मला सारख्या झुलवतां अहांत. पांचशें रुपये द्यायचें कबूल केलेत म्हणून त्या बिचाऱ्या श्रीधरपंतावर खोटा आळ घेतला. सच्कारासे सारे पन्नास रुपये दिलेत बाकीचे कुठं आहेत ? अशीं फुकट कामं करणारीं का माणसं आम्हीं ? वाः !

**भद्रा**—हात सोड माझा आधीं. गेलेच ते. अग, त्यांच्याकडूनच तुझी रकम घ्यायची आहे, म्हणून त्यांना गांठलें पाहिजे होतं. मला असं टकळी लावीत अडवून ठेवलंस आणि ते निसटून गेले. आतां कुठले देऊं पैसे तुला ? जा आतां त्यांच्याच मागोमाग.

**चंपा**—मला काय करायचं आहे त्यांच्याशीं ? ठराव झाला आहे तुमच्या कडे. मी फक्त तुम्हांला ओळखतें--मी डांगोरा पिटीन साऱ्या मुंबईभर. मग समजेल. आम्हांला काय ? पैशाशीं काम. पैसे द्या व मोकळ्या व्हा.

**भद्रा**—तुला भगवंतरावांचा पत्ता देतें. जा त्यांच्या ऑफिसांत आणि घे पैसे. ऑफिसांत गेलीस कीं अब्रूच्या भयानं देतील तुला रकम.

**चंपा**—अब्रू ? या लोकांना ? अहो, आम्ही नायकिणी बऱ्या. आम्हांला आमच्यापरीनं कांहीं अब्रूची चाड म्हणून आहेच; पण हे लोक अब्रू

कोळून प्यायले आहेत. त्यांच्याकडे जायचं? वा:! म्हणजे त्यांनीच धरावं आम्हांला पेंचांत. खाशी युक्ति! अशी नाहींहो मी फसायची!

**भद्रा**—आले वाटतं भगवंतराव--काय? हो--हो, आलें--थांब चंपे आलें हं! (जाते.)

**चंपा**—काय वेसवा आहे. आमचे पैसेसुद्धां गिळून बसते. (छबी येते)

**छबी**—चंपूताई, ओळखलंत का मला?

**चंपा**—अगबाई! त्या दिवसची ही मुलगी! (जाऊं लागते.)

**छबी**—थांबा जरा. भ्यायचं कांहीं कारण नाहीं.

**चंपा**—कारण नाहीं? वा:! म्हणजे त्या दिवसाची हकीगत मी विसरलें नाहीं अजून.

**छबी**—मला तेंच विचारायचं आहे. असं काय केलंत त्या दिवशीं?

**चंपा**—काय केलं? कपाळ माझं! या वेसवेच्या नादानं भल्या माणसावर नसता आळ घेतला. तुला काय सांगायचं पोरी? तूं कोण त्यांची?

**छबी**—त्यांच्या शेजारची मुलगी आहें मी. मला बाई आश्चर्य वाटलं. म्हटलं, आमचे श्रीधरभाऊ असे कसे निपजले. लोक त्यांना किती वाखाणतात आणि त्यांच्या घरीं तुम्हीं. मी घाबरलेंच पाहून.

**चंपा**—कोण नाहीं घाबरणार? तो बिचारा बावळा गडी--अगदीं सुन्न झाला. मला देखील का बरं वाटलं? पण पैशाच्या आशेनं केलं. आतां पैशापरी पैसे गेले आणि मनाची डांचणी तेवढी शिल्लक राहिली.

**छबी**—किती पैसे कबूल केले होते तुम्हांला?

**चंपा**—तुला पोरीला काय करायचं आहे त्याच्याशीं?

**छबी**—तुमच्या रकमेची भरपाई मी करतें—पण एक काम करा—

**चंपा**—तूं कुठून करणार भरपाई? किती रक्कम आहे माहीत आहे का तुला?

**छबी**—किती?

**चंपा**—साडे चारशें रुपये—पन्नास दिले होते आधीं?

छबी—एवढंच ना ? साडे चारशें रुपये म्हणजे माझ्या भातुकलीचा खेळ आहे.

चंपा—थोरा मोठ्यांची मुलगी दिसतेस. कीं आपल्या नुसत्या थापाच देते आहेस ? आतां तरी मी फसायची नाहीं हो.

छबी—हा माझा मोत्याचा कंठा—काय येईल याची किंमत ?

चंपा—छान ! म्हणजे आपलं चोरीच्या आरोपावर मला डोंगरीवर पाठवायचं. छान ! आज देशील कंठा काढून आणि उद्यां तुझ्या बापानं पोलीसांत वर्दी दिली कीं सोन्याच्या बांगड्यांशेजारीं लोखंडी हातकड्या पडतील वाः !

छबी—ती पहा माझी आई आली. तिनं दिले म्हणजे झालं ना ? ( गिरिजा येते. ) आई, या आपल्या चंपूताई—

गिरजा—कुठल्या चंपूताई ?

छबी—परवा आमच्या ताईनं सांगितली ना हकीगत श्रीधर भाऊंच्या खोलींतली—त्या ह्याच—

गिरजा—अस्सं ! चल छबे, आपण घरीं जाऊं.

छबी—आधीं ऐक तर खरं. मी त्यावेळीं होतें त्या खोलींत.

गिरजा—तूं ? तूं कशाला गेली होतीस तिथं ?

छबी—भद्रा मावशीला हिच्या बरोबर बोलतांना ऐकलं आणि त्यांच्या पाटोपाट आलें. ह्या दोघी खोलींत शिरायच्या पूर्वी टेबलाखालीं लपून बसलें.

चंपा—अग सटवे—आमच्यावर पाळत ठेवीत होतीस का ?

छबी—या सांगतील तुला त्या दिवशींची गम्मत—पण यांना साडे चारशें रुपये दिले पाहिजेत.

गिरजा—इकडे या बाई—छबे, तूं इथंच बैस. ( गिरजा व चंपा पलीकडच्या बांकावर बसून हळू हळू बोलूं लागतात इतक्यांत विठोबा येतो. )

विठोबा—स्त्रीदेवतेच्या शिशुभावने, एकटीच कां बसली आहेस इथं ?

छबी—काव्य शोधीत होतें.

पद—( लडगई जबसे उमर. )

दर्पणीं पाहुनियां काव्य मिळेना मातें । दिव्य अंधारिं तसें
काव्य दिसेना मातें ॥ धृ० ॥ तरुंना वेढिति ज्या सान लता
त्यां पुसतां । हाय ! त्या नाकळिती काव्य सुचेना त्यांतें ॥१॥
दिसल्या सागरिंच्या या लहरी वागडतां । हांसे ! स्वर्धुनिचें
गीत रुचेना त्यांतें ॥ २ ॥

विठोबा—छबे, काव्याची छबी बागेंतल्या बांकावर नसते—छबीचं काव्य या काव्यमय हृदयांतील उत्ताल तरंगावर नाचत असतं. तुला काव्यच पाहिजे असेल तर तें चर्नीरोड स्टेशनवर मिळणार नाहीं—चर्नीरोड गार्डनमध्यें नाहीं—या बॅकबेच्या समुद्राच्या लाटांत नाहीं—डेव्हलपमेंटच्या खात्यांत नाहीं—या हृदयाची खातेवही उघडून पहा, प्रत्येक पानावर तुला काव्याचं [illegible]

पद—( बेवफा कुछभी तेरे० )

भाळला या प्रणया जीव असा भोळा बाले । लागला या
हृदया बाण तुझा डोळा बाले ॥ अनुदिनिं या वदना आठ-
विलें गे दयिते । मनि रिझला विटला कर्म तया बाकी आलें ॥
विलपत हे रसना काव्यसुधा या विरहें । वल थिजलें विझलें
नर्म वचा शर्मी झालें ॥

छबि—मला यांतलं कांहीच कळलं नाहीं.

विठोबा—अहाहा ! नितांत निर्मलतेची ही प्रतिमा कोणत्या कवीला स्फूर्ति देणार नाहीं ? Oh ! What an artless girl ! छबे, शकुंतला तुझ्यापुढं कांहींच नाहीं-पण तू Miranda मिरँडा शोभतेस खरी. तीही अशीच समुद्रकांठीं वागडत असे. फुटलेल्या तारवांतला फर्डिनँड तिला भेटला होता. या मुंबईरूपी फुटक्या तारवांतून मीही असाच या बॅकबेच्या किनाऱ्याला लागलों आहें ! प्रीतिदेवते, बोल, या दासाला आपल्या चरणाचा आश्रय देशील का ?



वीठोबा——तुला इंग्रजी येतं का ?

छबी—देईन—मी देईन—तुमच्या मस्तकाला माझ्या चरणांचा आश्रय खास देईन.

विठोबा—म्हणजे छबे, तूं माझ्या डोक्यावर लाथ मारणार कीं काय ?

छबी—मीं आपलं काव्य केलं तें ! जमलं नाहीं वाटतं चांगलंसं ?

विठोबा—छबे, असं कसं होईल ? तुझ्या लाथेंत देखील काव्य आहे. मग शब्दांत कसं नसेल ? छबे, मी वेडा झालों आहे. सर्वत्र मला प्रेम दिसूं लागतं. तेथें कांहीं चाड नाहीं वयाची.

छबी—प्रेम तें कसं काय असतं हो ?

पद—माड-केरवा ( माधो मधुवनमें )

वण वण किति फिरलें ॥ मिळे नच
प्रेमा ॥ धृ० ॥ खेळवि माता फसवि
मुलांना । ममता वाटत विषमा ॥ १ ॥

विठोबा—भोळ्या जीवा, प्रेमाचं वर्णन करायला मराठी भाषेंत शब्द नाहींत. बंगालीतले शब्द संपले म्हणून कविवर्य रवींद्रनाथ इंग्रजींत शिरूं लागले. इंग्रजी आल्याशिवाय प्रेम कळणार नाहीं. तुला इंग्रजी येतं का ?

छबी—सव्वीसही अक्षरं ओळखतात.

विठोबा—बस्स ! पुरे झालं. इंग्रजींतलीं सव्वीस अक्षरं म्हणजे प्रेमाच्या सव्वीस कला आहेत. L-O-V-E एल-ओ-व्ही-ई लव्ह म्हणजे प्रेम. तुला लव्ह माहीत आहे ?

छबी—अजून शब्द येत नाहींत इंग्रजींतले.

विठोबा—लव्हपर्यंत मजल गांठ आणि पुढं इंग्रजी शिक्षण बंद कर.

गिरीजा—( पुढं येऊन ) आतां बंद कर वटवट.

विठोबा—हा वट्ट हुकूम मी शिरोधार्य करतों. ही दुसरी कोण देवता ? चंपे, हें काय आश्चर्य ? स्फूर्तिदेवते, ही नीरस रसिका-ही पण्यांगना तुझ्या सहवासांत का ?

चंपा—ह्या ध्यानाला ओळखतां का तुम्ही ?

गिरीजा—अगदीं लहानपणापासून ओळखतें. पण तुमची याची कुठली ओळख ?

विठोबा—इथली सारी स्त्रीजात मला ओळखते.

चंपे—याला हो कशाला ओळखीची जरूरी ? हाडूक दिसलं कीं जसं कुत्रं धावतं, तसा बायका दिसल्या कीं यायचाच मागनं. हा बॅकबेवरचा काळ पोलिसांच्या तडाक्यांत अझून कसा सांपडला नाहीं याचंच मला आश्चर्य वाटतं.

विठोबा—चंपे, रुक्ष पोलिसांच्या हृदयांत प्रेमाचा लवलेश नसतो. तुम्ही स्त्रिया जर पोलीस असतां तर तेव्हांच मी तुमच्या तडाक्यांत सांपडलों असतों, तुम्हीं माझ्या हातांत बेड्या ठोकण्यापूर्वी मींच तुम्हांला म्हटलं असतं कीं, पोलिसदेवते, मला चतुर्भुज कर. मॅक्डोनल्ड साहेबाऐवजीं पॅकहर्स्ट-बाई जर मुख्य प्रधान झाली असती--तर प्रेमाच्या साम्राज्यानं जग भरून गेलं असतं. भगवंता, तो सुदीन कधीं दाखवशील का ? ( हात वर करतो. काखेंतील चोपडी खालीं पडते. )

छबी—ही कसली चोपडी ?

विठोबा—तें माझ्या काव्याचं बाड आहे. हं--उघडूं नकोस.

छबी—हें तर नाटक दिसतं.

विठोबा—नाटक म्हणजे दृश्यकाव्य आहे. ( तिच्या हातांतील चोपडी काढून घेतो. )

छबी—दिव्यलावण्य ? नाटकाचं नांव आहे वाटतं ?

विठोबा—तें नाटकाचं नांव नव्हे. ‘ दिव्यलावण्य ’ हा माझा मॉटो आहे. माझ्या प्रत्येक काव्यावर तो लिहिलेला असतो.

चंपा—मी जातें आतां. माझ्या मैत्रिणी तिकडे वाट पहात असतील.

गिरिजा—ठीक आहे. पण उद्यां यालं ना आमच्या घरीं ?

चंपा—आतां कशी यायला विसरेन ?

**गिरिजा**—( छबीला एकीकडे ) पलीकडे नारायणराव बसले आहेत त्यांना मला भेटायला सांग. ( उघड ) अगदीं सारी तयारी बरोबर ठेवतें. यायला चुकूं नका मात्र. ( जाते. )

**विठोबा**—चंपककलिके, अशी जाऊं नकोस.

**चंपा**—माझं अडलं आहे खेटर तुझ्यासाठीं थांबायला.

**विठोबा**—चंपे, तुला पश्चात्ताप होईल बरं. आतां मी नुमता कवि नाहीं. मी आतां नाटककार झालों आहें. मार्मिक पुस्तकांचं सहारा वाळवंट ओलांडून रंगभूमीच्या नंदनवनांत मीं प्रवेश करणार आहें. चंपे, मी श्रीमंत होणार आहें. ग्वाडिलकरांच्या दुप्पट रक्कम घेऊन मी श्रीमंत होणार आहें.

**चंपा**—आतांच झाला नाहींस ना श्रीमंत ? असल्या थापांना मी भाळायची नाहीं हो. वाः !

**विठोबा**—तुला भाळणं भाग पडेल. गिरिजाबाई सुद्धां म्हणतात, कीं माझं काव्य ऐकतांना त्यांना प्रेमाची तंद्रा येते. रुक्ष राक्षसी, नीरस नायकिणी, पैशाची थैली वाजवीत येईन तेव्हां तरी तुझं प्रेम पाझरेल ना ?

**चंपा**—तेव्हांचं तेव्हां—आज फुटकी कवडीसुद्धां नाहीं ना खिशांत ! थैलीच्या पैंजणाशिवाय का आमचं पाऊल नाचत असतं ? वाः ! कळली अक्कल. ( जाते. )

**विठोबा**—हरहर ! या स्त्री जातीला काव्याची किंमत नसावी ना ?

पद—( सोहनी—तेवरा )

**मधु-मधुशा दिसति जरि युवति । हृदयिं परि खर विषा धरिती । नरनाशकरा सजाति अनुदिनीं ॥ धृ० ॥ मुखिं मधु भास मधुतम रसना । विलासपरागुणा अधुना । मनीं अधमा निरुपम पटुतर मधुगुणीं ॥ १ ॥**

**बाबासाहेब**—( प्रवेश करून ) नमस्कार कविराज, आलों कीं नाहीं अगदीं नेमका ? चोपडी आणली आहे वाटतं बरोबर ? आतां करा वाचायला आरंभ.

**विठोबा**—आधीं असं पहा, या नाटकाचं नांव पूर्वी 'दिव्यलावण्य' असं ठेवलं होतं. आतां मी बेत बदलला आहे. आतां याचं नांव 'दिव्य-तारुण्य' ठेवणार आहे. हें नाटक ऐतिहासिक आहे—

**बाबा**—छेः छेः, ऐतिहासिक नाटकाची सीनसिनरी आणि पोपाख करायला सध्यां आम्हांला सवड नाहीं. आपलं सामाजिकच बरं.

**विठोबा**—ठीक आहे. पात्रांचीं नांवं बदलतों कीं झालंच सामाजिक. त्यांत कठीण काय आहे? भाषा तीच—विचार तेच—उपमा अलंकार तेच—नांवं बदललीं कीं झालं सामाजिक.

**बाबा**—तें आम्हांला कांहीं कळत नाहीं. नाटकाला पैसे मिळाले, कीं तें आमचं उत्तम नाटक. वर्तमानपत्रं टीका करूं लागलीं तर त्यांच्या अंगावर कायमच्या जाहिरातीचं हाडूक फेकलं कीं तोंड बंद. उलट स्तुतीच करूं लागतात.

**विठोबा**—ती खबरदारी घेतलीच पाहिजे. मी अगदीं स्वतंत्र विचाराचा लेखक असल्यामुळं मला शत्रू फार आहेत. धडाडीनं लिहिणं हें माझं ध्येय. मग कुणी कांहीं म्हणो, मला जगाची पर्वा नाहीं.

**बाबा**—तुमची धडाडी आम्हांला भोंवली नाहीं म्हणजे झालं. नव्या कवीचं नाटक घेतांना आम्हांला जरा विचार करावा लागतो. पण करतां काय? जुनीं माणसं सारींच गुंतून पडलीं आहेत. कोल्हटकरांचा कुठं पत्ताच नाहीं, खाडिलकर 'नव्या काळा'त गुंतले आहेत, ते वरेरकर म्हणे आतां फिल्म काढूं लागले आहेत, टिपणीसांनीं गुजराथी नाटक मंडळींत उडी मारली आहे—एवढ्यामाठींच तुमच्यासारख्या नव्या कवींकडे वळावं लागतं आहे.

**विठोबा**—मलाही जुनाच म्हणाना? वाटेल तितक्या नाटकांचा कर्ता म्हणून जाहिरात द्या. नाटकांच्या नांवाची यादी मी देतों तयार करून. प्रख्यात—सुप्रसिद्ध—महाराष्ट्राचे आवडते नाटककार—अशीं कांहीं तरी विशेषणं द्या ठोकून.

**बाबा**—त्याची नको काळजी. तुमच्या नांवापूर्वी श्रीयुत घालतों--राजमान्य राजश्री घालतों—वेदशास्त्रसंपन्न—हरिभक्तिपरायण—किंवा हवं तर कैलासवासी सुद्धां घालतों, पण नवा खेळ द्या म्हणजे झालं. नव्या नाटकाशिवाय आतां हा मुक्काम निभावणं कठीण झालं आहे. त्या श्रीधरपंतांनीं तसा दगा दिला नसता तर आज त्यांचं नाटक नवंजुनं सुद्धां होऊन गेलं असतं.

**विठोबा**—त्याची नको आतां काळजी. चला, त्या पलीकडच्या बाकावर बसून वाचूं. ( दोघे जातात. गिरिजा व नारायणराव प्रवेश करतात. )

**गिरिजा**—एव्हांच श्रीधरपंतांना कांहीं कळवायचं नाहीं. मी असा बेत जमवून आणणार आहे कीं, सारे एकाच वेळं कैचींत सांपडतील. दुसरं असं करा—त्या मॅनेजरला गांठा. मला तें करणं शक्य नाहीं, म्हणून मुद्दाम तुम्हांला बोलावून आणलं. नित्याच्या सडेतोडपणावर जाऊं नका. थोडी मुत्सद्देगिरी लढवा आणि त्या चोपडीचं रहस्य समजून घ्या.

**नारायण**—नांव तेंच. मला अगदीं पक्कं माहीत आहे. वाचल्याबरोबर मी हटकून सांगेन. मीच कां ? आणखी पुष्कळजणांनीं तें नाटक वाचून पाहिलं आहे. सर्वांना साक्षीला उभे करीन आणि हरामखोराचे चांग दांत पाडीन.

**गिरिजा**—पुन्हां सांगतें, उतावीळपणा करूं नका. नाहींतर सारंच फिसकटायचं. काय तरी दुर्दशा हा ! परवांच श्रीधरला रस्त्यांतून जातांना पाहिलें आणि माझ्या डोळ्यांना टचकन् पाणी आलं. हाडामासाचा माणूस—संकटं तरी किती सोशील ?

पद—( पापी जगसारा )

**आली गति दीना । धनहीना सुजना । नाठवि अपमाना**
**॥ धृ० ॥ कशि माया नाहीं विधिच्या विधाना । सुजनं**
**त्यजितां अभिमाना ॥ १ ॥**

**नारायण**—सारं जगच उलटलं असतांना माझ्या श्रीधरबद्दल तुम्हांला एवढा कळवळा येतो, हें पाहून मला काय वाटतं तें मी कसं सांगूं ?

**गिरिजा**—नारायणराव, हा परमार्थ नव्हे. नुसता स्वार्थ आहे. माझ्या मुलीच्या कल्याणासाठीं हा सारा खटाटोप. पहिल्यापासून या आरोपावर माझा विश्वास नव्हता. शिधु माधुकऱ्याचा श्रीधरपंत होईपर्यंत मी त्याला पहात आलें आहें. आईच्या नजरेला फसवायचं सामर्थ्य प्रत्यक्ष परमेश्वराला देखील नसतं.

**नारायण**—थांबा. ते पहा दोघेही जायला निघाले. तुम्ही जा. आतां मी करतों सारी तजवीज. ( गिरिजा जाते. नारायणराव आड उभा रहतो. विठोबा व बाबासाहेब पुढें येतात. )

**विठोबा**—अशी आहे त्यांतली गंमत. पुढं पुढं तर फारच मजा ८. दिसत नाहीं आतां चांगलं, त्यामुळं वाचायला पंचाईत पडते.

**बाबा**—आतां असं करा. उद्यां सकाळीं कंपनीच्या बिऱ्हाडींच या. मीं पाहिली चांचणी. नाटक बरं दिसतं. मालकांनादेखील कळण्यासारखं आहे. आतां त्यांच्यासमोर वाचून दाखवायला कांहीं हरकत नाहीं. माझ्या selection सिलेक्शन् बद्दल मला कांहीं अगदींच गाढव ठरवणार नाहींत.

**विठोबा**—ठीक आहे उद्यां बिऱ्हाडींच येतों तुमच्या ( कांहीं बायका-पलीकडून जातात. ) अरेच्या ! त्या पहा--चंपा, कलिका, लतिका, हंसिका, तारका, चंद्रिका—येतों बरं उद्यां— ( पळत निघून जातो. )

**बाबा**—काय वेडगळ आहे ! ( नारायणराव येऊन त्याच्या खांद्यावर हात ठेवतो. ) कोण ? काय दचकलों मी ? तुम्ही का ते नारायणराव ? काय एकाद्याला असे घाबरवतां !

**नारायण**—विठोबाशीं काय चाललं होतं ?

**बाबा**—आमचं नाटकवाल्यांचं काय--हजाराशीं हजार व्यवहार ! चाला-यचंच. पण काय वेडगळ माणूस आहे हो ! बायका दिसतांच आपला मा-गनं धांवत गेला. आपल्याला पाहून तिटकारा आला बुवा--पण करतां काय नवं नाटक पाहिजे ना !

**नारायण**—विठोबानं नाटक लिहिलं आहे वाटतं ?

**बाबा**—छान आहे ! मधून मधून पाहिलं चाळून. आहे, थोडी मजा आहे. होतकरू आहे. पुढं आणला तर होण्यासारखा आहे.

**नारायण**—मला एकदां ऐकवाल का तें नाटक ?

**बाबा**—तुम्हांला आज काय करायचं आहे त्याच्याशीं ? पहिल्या खेळाला तुमच्यासाठीं दोन खुर्च्या राखून ठेवतों. अगदीं तुमच्यासाठीं म्हणून. नाहीं तर आमच्या पहिल्या खेळाचा प्लॅन हातोहात भरून जात असतो.

**नारायण**—तसंच कांहीं कारण आहे. तुम्हांला मागाहून सांगेन. काय वाटेल तें करा. पण तेवढं विठोबाचं नाटक एकदां माझ्या कानावर घाला.

**बाबा**—असं करा. उद्यां सकाळीं तो नाटक वाचायला आमच्या बिऱ्हाडीं येणार आहे. माझ्या खोलींत बसून चुपचाप ऐका. माझ्या खोलींत दुसरा कुणी यायचा नाहीं. मालक सुद्धां !

**नारायण**—तो पहा, आला पुनः ! चला, आतां रस्त्यानं जातानांच बोलूं.

**बाबा**—काय ध्यान आहे ! भर बागेंत बायकांच्या मागं लागायला लाज सुद्धां कशी वाटत नाहीं याला ? ( दोघे जातात. चंपा व कांहीं मुली, त्यांच्या मागून धांवत विठोबा प्रवेश करतो. )

**चंपा**—आमची वाट सोड पाहूं.

**विठोबा**—( हात पसरून रस्ता अडवून ) प्रीतिपंकजकिसलयकोमले, माझं अभिनंदन कर. मी आतां नाटककार झालों आहें. कालिदास भवभूतीसारख्या कविश्रेष्ठांच्या पंक्तीनं मी पावन होणार. जयवंत नाटक मंडळीनं माझं नाटक घेतलं. या आनंददायक प्रसंगीं माझं पहिलं अभिनंदन तुमच्याकरवीं होऊं द्या. कुणीही माझं अभिनंदन करा, कोणत्याही प्रकारानं करा, मला त्यांत आनंद वाटेल; पण पहिलं अभिनंदन पुरुषांचं नको. देवतांनो, तुमच्या दिव्य गायनानं माझ्या ' दिव्यतारुण्याला ' आशीर्वाद द्या.

चंपा—आम्हांला सुद्धां लाज वाटते पण या मेल्याला कांहींच कसं नाहीं वाटत ?

विठोबा—कांहींच नाहीं कसं ! तुमच्या दर्शनानं मला आनंद वाटतो.

चंपा—निर्लज्जा, कोणत्या परमेश्वरानं तुला घडवला रे ?

विठोबा—प्रेमाच्या परमेश्वरानं—प्रणयाच्या देवतेनं—सौंदर्याच्या ब्रह्मस्वरूपानं आपली सर्व शक्ति एकवटून तारुण्याची मूस तयार केली आणि त्यांत काव्याचा रस ओतून जहरी जिव्हाळ्याच्या जरबेची आंच दिली. त्या मुशींतून जें तप्तकांचन बाहेर पडलं तोच हा तुमचा दास कविवर्य विठोबा—

चंपा—आतां तोंड बंद केलं नाहींस तर मी पोलिसला हांक मारीन.

विठोबा—मी प्रेमाची हांक फोडली तर तुझी हांक त्या खालीं दडपून जाईल. तारके, तूं माझ्या हृदयाची तारका आहेस—तोंड फिरवलंस ? ही तारका मावळली. चंद्रिके, आतां तूं तरी उदीयमान हो. अरेरे ! या चंद्रिकेला ग्रहण लागलं. लतिके, आपल्या भुजलतेनं या विठोबारूपी वृक्षाला आलिंगन दे--नाहीं ? वाळली ही लतिका. कलिके, तुझ्या प्रेमाची कळी तरी खुलणार आहे का ? नाहीं ? ही कलिकाही कोमेजली. चंपे—चंपे—तुझ्याशिवाय मला आतां आधार नाहीं. अग, कुणी तरी माझं अभिनंदन करा ग.

चंपा—विठोबाराया, आतांपर्यंत झाली ती थट्टा. आतां खरं सांगूं ?

विठोबा—सांग—गिरिजाबाईना प्रेमाची तंद्रा लागते—लक्ष्मी मला पाहून प्रेमानं गारठते—छबी—


चंपा—काय, छबी ? वाः ! ती चिमुरडी पोर ?

विठोबा—तेथें कांहीं चाड नाहीं वयाची. भद्रामावशीं सुद्धां—

चंपा—अरे दळभद्या—

विठोबा—चंपक कलिके, कोमेजूं नकोस.

चंपा—वाः ! म्हणजे या वयांतच मी कोमेजतें वाटतं ? नाहीं बरं नाहीं. विठोबाराया, तुझ्या विरहाशिवाय मी कोमेजणार नाहीं.



विठोबा—हा घे गाल !

**विठोबा**—तर मग आतां माझं अभिनंदन कर पाहूं.

**चंपा**—कसं करूं अभिनंदन ?

**विठोबा**—कॉर्पोरेशनमध्यें भगवंतराव निवडून यावे म्हणून मीं त्यांना व्होट्स दिलीं. नाटककारांत मीं निवडून यावं, म्हणून तूं आपले ओंठ देणार नाहींस का मला ?

**चंपा**—गाल पुढं कर पाहूं. या ग साऱ्याजणी.

**विठोबा**—अहाहा ! धन्य माझं काव्य—धन्य माझी कविता—धन्य माझं जीवन—धन्य तो परमेश्वर कीं, ज्यानं असला प्रेमाचा पुतळा निर्माण केला. हा घे गाल. ( त्या त्याच्या थोबाडींत देतात. नारायण येऊन मोठ्यानें हंसतो. )

पडदा पडतो.

# अंक ४ था.

( शंकररावांचा दिवाणखाना. )

**गुंडू**—माफ करा श्रीधरपंत, आम्हांला साहेबांचा सक्त हुकूम आहे. उगीच गरिबाच्या पोटावर कां पाय देतां ?

**श्रीधर**—वाटेल तर तूं घरांत जा. मी असाच आंत येईन. कुणींही नको म्हटलं तरी मी आज आंत येणार.

**गुंडू**—हात जोडतों--पांया पडतों--गरिबाच्या अन्नाकडे लक्ष द्या आणि आंत येऊं नका. ( पडद्यांत लक्ष्मी—कुणाशीं बोलतो आहेस गुंडू ? ) आपले हे ते-ते--जा पाहूं आतां—नाहीं कुणी नाहीं. ( पडद्यांत लक्ष्मी—नाहीं कसं ? कुणाशीं तरी बोललेलं मला ऐकूं येतं आहे ना ? कोण आहे ? )

**श्रीधर**—आतां तर मी मुळींच जाणार नाहीं.

**लक्ष्मी**—कोण आहे तें गुंडू ? ( पाहून ) अस्सं ! आपण ? गुंडू, बाबांचा हुकूम काय आहे ?

**गुंडू**—मी सांगितलं पण ते ऐकूनच घेईनात.

**लक्ष्मी**—धक्की कां नाहीं मारलीस ?

**गुंडू**—म्हणजे तें असं झालं कीं—मी म्हटलं—मला वाटलं—( निसटून आंत जातो. )

**श्रीधर**—लक्ष्मी, मी विलायतेला जायला निघालों आहे—कां, बोलत कां नाहींस ? मी विलायतेला जातों आहे. जगलों वांचलों तर परत येईन. आलोंच परत तर मला काय दिसेल कोण जाणे ! इथल्या इथंच असतांना प्रेमाचीं हृदयें पारखीं झालीं होतीं--एका गांवाचीच विलायत झाली होती. आतां इथं राहिलों काय किंवा दूर देशीं काळं केलं काय—दोन्ही सारखींच. जायच्यापूर्वीं असं वाटलं, कीं एकदां तुझी भेट घ्यावी—बाई-साहेबांच्या पायावर डोकं ठेवावं आणि हिंदुस्तानला अखेरचा रामराम ठोकावा.

पद—बहार-त्रिवट ( नहिरुत नाहीं फूलि )

अविरत राही माया । परक्या जगिं जाया । जरि तव
जननी वराभया ॥ धृ० ॥ जनिं वनिं विचराया । गुणा
उणा नसतां । सादर विजया वरो जया ॥ १ ॥

**लक्ष्मी**—आई घरांत नाहीं.

**श्रीधर**—केव्हां येतील ?

**लक्ष्मी**—मला माहीत नाहीं.

**श्रीधर**—तोंपर्यंत मला थांबावं लागणार.

**लक्ष्मी**—बाबा येतील आतां.

**श्रीधर**—त्यांनाही भेटायचंच आहे मला. ( खुर्चीवर बसतो. ) लक्ष्मी, मी विलायतेला जातों आहें.

**लक्ष्मी**—कळलं मला.

**श्रीधर**—धक्की मारून मला बाहेर घालवायचं आहे का ! गुंड्या गेला—दुसरं कुणी नाहीं इथं—धक्की मारून घाल ना मला बाहेर !

**लक्ष्मी**—मला कळतात हीं बोलणीं बरं !

**श्रीधर**—ठीक आहे, मी जातों आतां. बाईसाहेबांना सांग—

**लक्ष्मी**—आपणच सांगावं काय तें—मी नाहीं कुणाचे निरोप सांगणार !

**श्रीधर**—स्वतांच सांगायचं म्हणजे मला इथं थांबावं लागणार.

**लक्ष्मी**—मग थांबावं. कुणीं नको म्हटलं आहे !

**श्रीधर**—तूंच.

**लक्ष्मी**—तेव्हां म्हटलं असेल. आतां नाहीं ना पुनः म्हटलं ?

**श्रीधर**—लक्ष्मी, विलायतेहून मी परत येऊं का ?

**लक्ष्मी**—मला काय विचारतां !—जिला विचारायचं तिला विचारा.

**श्रीधर**—जिला विचारायचं तिलाच विचारतों आहें. उद्यां सकाळच्या बोटीनं मी मुंबईला रामराम ठोकणार. मीं परत यावं असं वाटतं आहे का तुला!

**लक्ष्मी**—पुनः पुनः तोच प्रश्न कशाला करतां ?

**श्रीधर**—उत्तर पाहिजे म्हणून.

**लक्ष्मी**—उत्तर मिळायचं नाहीं.

**श्रीधर**—मिळायचं नाहीं कीं, द्यायचं नाहीं ?

**लक्ष्मी**—काय वाटेल तें समजा.

पद—( गोरागोरा मुखडा. )

**फोल बोला रमणि धरि न मनिं ॥ धृ० ॥ नारि कठिन**
**वच साहत राहति । मायाभासें नाथविलासें ॥ १ ॥**
**पाहि रजनि जरि त्यावरि भाळलि । तारा हांसे**
**चंद्रविकासें ॥ २ ॥**

**श्रीधर**—लक्ष्मी, एकदां तोंड फिरवून माझ्याकडे पाहा. हिंदुस्थान सोडायच्या पूर्वी हा शिशु माधुकऱ्या तुझ्या दारीं भिक्षा मागायला आला आहे. भिक्षा घालायची नसली तरी त्याच्याकडे नुसतं पाहायचं तरी धाडस कर.

**लक्ष्मी**—पाहिलं असतं. नव्हे—पायसुद्धां धरले असते. पण वांकडं पडलेलं पाऊल आतां पांया पडायला अपात्र झालं आहे.

**श्रीधर**—वाकडं पाऊल पडलं आहे. अशी तुझी खात्री आहे का ?

**लक्ष्मी**—प्रत्यक्षाला प्रमाण कशाला ?

**श्रीधर**—प्रत्यक्षाची खात्री झाली आहे का ? कुणी वेऱ्यानं माझा दावा साधला असेल असं नाहीं तुला वाटत ? माझी नाटकाची चोपडीही त्याच दिवशीं चोरीला गेली तें तुला कोणी सांगितलं नाहीं का !

**लक्ष्मी**—बाबा म्हणत होते असं कायसंसं !

**श्रीधर**—चोपडी चोरीला जाणं आणि ते तसलं वालंट माझ्यावर येणं या दोन्ही गोष्टी एकाच वेळीं घडल्या. या दोन्ही प्रसंगांचा कांहीं तरी परस्पर संबंध असेल असं नाहीं वाटत तुला ?

**लक्ष्मी**—मी असल्या गोष्टींचा विचारच करीत नाहीं. मला काय करायचं आहे त्याचा विचार करून ?

**श्रीधर**—हें अंतःकरणापासून बोलते आहेस का !

नागरी ग्रंथ संग्रहालय
सं. ..........
भा. ...
काशी.



श्रीधर--माझा ईश्वर प्रसन्नच होत नाहीं त्याला काय करू.

**लक्ष्मी**—तें तुमचं तुम्हींच ओळखा.

**श्रीधर**—ओळखलं आहे म्हणूनच विचारतों कीं, हें अगदीं मनापासून बोलते आहेस का ?—आतां बोलायचंच नाहीं वाटतें ? बरं बुवा, हा अबोला तरी अगदी मनःपूर्वक आहे का ?

**लक्ष्मी**—तीन महिनेपर्यंत कुठं कुणाशीं कोण बोललं आहे ?

**श्रीधर**—तीन महिन्यांच्या अबोल्यानंतर आतां जुन्या प्रेमाला वाचा फुटेल अशी मला आशा होती. लक्ष्मी, एकप्रकारें उद्यां माझा मृत्यूच होणार. मी परत यावं अशी इच्छा तूं दाखविली नाहींस तर हिंदुस्थानांत परत येऊन तरी काय करायचं ? हिंदु रमणी क्षमाशील असते. घटकाभर धरून चाल, कीं मी अपराधी आहें. पश्चात्तापानं तरी मी पुनीत होणार नाहीं का ?

**लक्ष्मी**—कांहीं अपराध असे आहेत कीं, त्यांचं प्रायश्चित्तच घेतां येत नाहीं.

**श्रीधर**—लक्ष्मी, ईश्वरसाक्ष मी तुला सांगतों, कीं मी निरपराधी आहें. मी अपराधी आहें असें अझूनही तुला वाटत असेल तर त्याचं प्रायश्चित्त मी योजलंच आहे.

**लक्ष्मी**—तें कोणतें ?

**श्रीधर**—राघोबादादाला रामशास्त्र्यांनीं सांगितलेलं देहांत प्रायश्चित्त !—दचकूं नकोस. आत्महत्या करण्याइतका मी भेकड नाहीं. तसा असतों तर त्याच दिवशीं मीं आत्महत्या केली असती. पण पुढील आशेवर मी ज़ीव धरून ठेवला. ईश्वराच्या घरीं न्याय आहे म्हणतात, त्याची कसोटी पाहात राहिलों. अझूनही ईश्वराला दया येत नाहींशी दिसते.

**लक्ष्मी**—मग ईश्वराच्या दारांत धरणं धरून बसा जा.

**श्रीधर**—ईश्वराचाही मत्सर वाटला तुला ? लक्ष्मी, मी माझ्या ईश्वराच्या दारांतच धरणं धरून बसलों आहें. माझा ईश्वर प्रसन्न होत नाहीं त्याला काय करूं ?

**लक्ष्मी**—अशी मी चढून जायची नाहीं बरं कां ?

**श्रीधर**—भाषा थोडी बदलूं लागली.

**लक्ष्मी**—बाबा आतां येतील, आतां जा पाहूं इथून.

**श्रीधर**—तूं परत यायला सांगितल्याशिवाय मी इथून जाणार नाहीं. बाबा येवोत नाहीं तर कुणी वाटेल ते येवो.

**लक्ष्मी**—विलायतेला जायचं—हें कसं काय जमल ?

**श्रीधर**—दयाळशेट नांवाच्या एका गुजराथी व्यापाऱ्याचा कंपॅनियन म्हणून मला जायची संधि मिळाली आहे.

**लक्ष्मी**—पुढं तिकडे गेल्यावर कसं काय होणार ?

**श्रीधर**—तें परमेश्वराला माहीत. हें काय लक्ष्मी, तूं डोळे पुसते आहेस. तुला माझी दया आली का ? या दयेच्या पोटीं प्रेम आहे कीं, प्रेमामुळं ही दया उत्पन्न झाली ?

पद—( जीवनपुरी-झपताला, सुमरहूं नामको. )

**प्रियजना पारखा असतां प्रियसखा । त्यागिलें काय स्वजनीं तें सांगें ॥ धृ० ॥ साजिरें बालपण झालें सुखाचें । तरुणपण सुनें मम व्हावें त्यागें ॥ १ ॥**

**लक्ष्मी**—कशाला असा माझा छळ करतां ? संशयानं चोहींकडून मला ग्रासून टाकलं आहे. डोळ्यांनीं पाहिलं तें खरं मानूं कीं, तुमच्या तोंडच्या शपथेवर विश्वास ठेवूं ? कांहींच निश्चित ठरवतां येत नाहीं. दोन्ही खरीं वाटतात—दोन्ही खोटीं वाटतात. आतां तुम्ही इथं येण्याचं धाडस केलंत, निर्लज्जपणानं आलांत कीं निरपराधी म्हणून आलांत !

**श्रीधर**—तुला काय वाटतं ?

**लक्ष्मी**—मला कांहींच कळत नाहीं म्हणून सांगितलं ना एकदा ? हिंदु कुमारीच्या अंतःकरणाची व्यथा हिंदु तरुणांना कळत नाहीं.

**श्रीधर**—हिंदु तरुणांना अंतःकरण नसतं का ? तसं अंतःकरण नसतं तर निर्लज्जासारखा इथं धावत कां आलों असतों ? भावी अपमानाची भिती मला नव्हती का ?—लक्ष्मी, विलायतेहून मी परत येऊं का ?

**लक्ष्मी**—तें आतां आईलाच विचारा. बाबा यायच्यापूर्वी आई येइल तर फार बरं होईल.

**श्रीधर**—मी जातों तर आतां. पुढं कांहींही होवो माझ्या मनाचं समाधान झालं.

**लक्ष्मी**—पण माझ्या मनाची काय वाट ?

पद—( सूरत कैसी प्यारी )

या जीवा शीण भारी । विपारी भूमि सारी ।। मानी प्रेमा झाली सीमा । प्रियकर दैवें सांडी गेहा ।। धृ० ।। लालन पालन घरचें सरलें । नुरलें बाल्य तरुणपण स्फुरलें । मी झालें निराधारी । या प्रणया जीवचारि ।। १ ।।

**गिरिजा**—( प्रवेश करून ) कोण ? श्रीधरपंत ? वरा धीर केलात इथं यायचा ?

**श्रीधर**—मी निरोप घ्यायला आलों आहें. उद्यांच्या बोटीनं मी विलायतेला जायला निघालों आहे.

**गिरिजा**—मग लक्ष्मी काय म्हणते ?

**श्रीधर**—ती तुमचीच वाट पहात होती.

**गिरिजा**—किती वेळ झाला तुम्हांला इथं येऊन ?

**श्रीधर**—झाला सुमारें अर्धा तास.

**गिरिजा**—तुमच्याशीं न बोलायची प्रतिज्ञा मोडली वाटतं हिनं ? काय ग लक्ष्मी, गृहस्थपणाला जागून चार शब्द तरी बोललीस कां यांच्याशीं ?

**श्रीधर**—बोलायचं काम बहुतेक मीच करतों आहें.

**गिरिजा**—एवढा वेळ तिनं ऐकून घेतलं हें काय थोडं नाहीं. केव्हां येणार परत विलायतेहून ?

**श्रीधर**—तें लक्ष्मीच्या मतावर अवलंबून आहे. तिनं ये म्हटलं तर यायचं. नाहींतर मातृभूमीला हाच शेवटचा रामराम.

**गिरिजा**—काय ग सांगितलंस त्यांना ?

लक्ष्मी—तूंच सांग काय तें. ( जाते. )

गिरिजा—श्रीधरपंत, यापूर्वीच तुम्हीं इकडे यायला पाहिजे होतं.

श्रीधर—तसं धाडस माझ्याच्यानं करवलं नाहीं. हिंदुस्तान सोडणार म्हणूनच जिवाचा धडा करून आज इथं आलों.

गिरिजा—असला हा दुबळेपणा हिंदुस्तानच्या किनाऱ्यावर ठेवून मग बोटींत पाय टाका.

श्रीधर—परिस्थितीनं मला दुबळं केलं. बाईसाहेब, मी दरिद्री अनाथ पोर. लहानपणापासून मधुकरीवर वाढलों. वाटेल त्या घरचं अन्न जसं मला पचवतां येत होतं, तसंच वाटेल त्यांचीं बोलणींही मला पचवावीं लागत होतीं. म्हणूनच आला आरोप मी सहन केला. बचाव करायला तरी पुरावा कुठं होता ? हल्लींचा न्याय पुराव्यावर अवलंबून असतो. माझा शब्द खरा कोण मानणार ? दरिद्री माणसाच्या शब्दाला किंमत नसते बाईसाहेब.

गिरिजा—माझ्याकडे कां नाहीं आलांत ?

श्रीधर—कोणत्या तोंडानं येऊं ? साहेबांनीं कांहींच ऐकून घेतलं नाहीं. लक्ष्मीची तर खात्रीच झालेली. तुम्हीं काय म्हणाल हें मला तरी कसं कळावं ? किती झालं तरी मी परका. आपलीं माणसं सांगतील तें खरं वाटायचं कुणालाही.

गिरिजा—कुणाचंही सांगणं मला खरं वाटलं नाहीं. मला काय वाटलं याचं प्रत्यंतर येईलच लवकर !

श्रीधर—आज तीन महिन्यांत एवढाच एक समाधानाचा शब्द मला ऐकायला मिळाला.

गिरिजा—पुष्कळसं दुःख झालं म्हणजे समाधानाचा एकादा शब्दही आनंद देतो. श्रीधरपंत, असं हताश होऊन कसं चालेल जगांत ? आपल्यावरचा आरोप धुवून टाकण्यासाठीं तुम्हीं काय प्रयत्न केलात ? पोलिसांत चोरीची फिर्याद तरी दिलीत का ?

श्रीधर—फिर्याद देऊन काय होणार होतं ?

गिरिजा—खरोखरच तुमच्या घरीं चोरी झाली, एवढं तरी शाबित झालं असतं. तुम्ही स्वस्थ बसलांत आणि इतरांचा संशय वळावत चालला. समोर दिसतं तसंच कुणालाही वाटतं खरं, पण तें तसं नव्हतं हें सिद्ध करायचं काम तुमचं होतं. तसं केलं नाहींत म्हणूनच अझूनपर्यंत दुःखी राहणं भाग पडलं. चांगुलपणा दाखवायला देखील कांहीं मर्यादा असते. अस्थानीं चांगुलपणा दाखविल्यानं माणुस आपलंच नुकसान करून घेतो. पुरुषासारखे पुरुष तुम्ही ! मुळु मुळु रडत बसणं बायकांना शोभतं, तुम्हांला शोभत नाहीं.

पद—भैरवी केरवा ( गोविंदको भजन )

**कां निंदकां नमावें । अपमानें मानि व्हावें ॥ धृ० ॥**
**संकटिं धीरा नच देवाविण । कधिं न कुणा जागिं भ्यावें ॥ १ ॥**

श्रीधर—असं झालं खरं. पण त्याचं आतां काय ? ईश्वराला केव्हां दया येईल तेव्हांच माझ्यावरचा खोटा आरोप धुऊन निघेल.

शंकर—( प्रवेश करून ) कोण ! श्रीधर ?

श्रीधर—माफ करा–मी शेवटची भेट घ्यायला आलों आहें. मी उद्यां विलायतेला जातों आहें.

शंकर—तुला विलायतेला जातां येणार नाहीं.

गिरिजा—तें कां ?

शंकर—मीच बोलावणार होतों त्याला. पण आयताच आला तें बरं झालं. हिशेबाच्या वार्षिक तोंडमिळवणींत घोंटाळा पडला आहे. सारा हिशेब श्रीधरच्याच हातचा आहे. आमच्या फॅक्टरीच्या हिशेबाचं वार्षिक ऑडिट् जुळवून दिल्याशिवाय त्याला कुठंही जातां येणार नाहीं.

श्रीधर—पण मला आपण बडतर्फ केलं आहे.

शंकर—पुनः रुजू करून घेतों हवा तर. हिशेबांत तूंच घोंटाळा करून ठेवला नसशील कशावरून ! तें कांहीं नाहीं. हिशेब जुळवून दिल्याशिवाय जोलास तर हातकड्या घालून तुला बोटीवरून परत आणीन.

श्रीधर—पण ही संधि फुकट गेली तर पुढं मला कोण धाडील विलायतेला ?

शंकर—त्याच्याशीं मला काय करायचं आहे ? माझा हिशेब जुळवून दे आणि मग वाटेल तिकडे निघून जा.

श्रीधर—उद्यांचा दिवस थांबलों तर दयाळशेटना दुसरा कंपॅनियन पहावा लागेल.

शंकर—मग पहातील ते. त्याची तुला नको काळजी.

श्रीधर—त्यांच्याबरोबर जायला कोण वाटेल तो तयार होईल. पण माझी वाट काय ? आज गांठचा एक पैसा खर्च केल्याशिवाय मला विलायतेला जायला मिळतं आहे. पण पुढं कोण देईल मला मदत ?

शंकर—मला काय होय त्याचें ! नको जाऊं विलायतेला.

गिरिजा—दुसऱ्याला स्वतः कांहीं द्यायचं नाहीं—पण परभारें कुणाचं काम होत असेल तर त्याला देखील अडथळा करणं बरं दिसत नाहीं. त्यांना नोकरीवरून काढून टाकलं होतं ना ? यापूर्वीच ते गेले असते तर ?

श्रीधर—आणि मी मेलों असतों तर ?

शंकर—मेला नाहींस ना अजूनपर्यंत ? जिवंत आहेस ... तुला हें काम पुरं करून दिलंच पाहिजे. नोकरीवरून दूर केलं ... कामाची जबाबदारी कांहीं नाहींशी होत नाहीं.

श्रीधर—जिकडे पहावं तिकडे दुर्दैवाचा मारा. बाईसाहेब काय करूं मी आतां ? मी दुबळा आहें हें तुम्हांला माहीत आहे पण पदोपदीं अशीं संकटं येऊं लागलीं—तोंडाजवळ आलेला घास असा काढला जाऊं लागला तर धीराचा माणूस देखील दुबळा होईल—मी तर मुळचाच दुबळा.

गिरिजा—दुबळं कोण नाहीं ? श्रीमंतीच्या जोरावर—अधिकाराच्या जोरावर—दुसऱ्याला हाणून पाडून विजयी ठरणारा प्रत्येक माणूस दुबळा असतो. स्वार्थाच्या मागं लागून दुसऱ्याला नाडणारा आणि तसं करतांना परोपकाराच्या पोकळ गप्पा बोलून वीर ठरणारा प्रत्येक माणूस दुबळा असतो.

आम्ही आमच्या सत्तेच्या जोरावर स्वतःला मोठे म्हणवतों पण श्रीधरपंत आम्हीं पक्के कॉवर्डस् आहोंत. (शंकररावास) मीं काय म्हटलं तें कळलं का?

**शंकर**—काय कळायचं त्यांत? या वर्षांचे हिशेब न जुळले तर माझे भागीदार माझ्या गळ्याला फांस लावतील.

**गिरिजा**—केवळ अविचारानें श्रीधरला नोकरीवरून दूर केलं त्याचवेळीं हा विचार करायला पाहिजे होता. भागीदार दोष देतील एवढ्यासाठीं त्याच्या जन्माचं मातेरं, करायचं का? उद्यां तुमचे भागीदार त्याला विलायतेला पाठवावयाची तजवीज करतील का? श्रीधरपंत, खुषाल विलायतेला जा आणि यशस्वी होऊन या. माझा तुम्हांला पूर्ण आशीर्वाद आहे.

**श्रीधर**—बाईसाहेब, या तुमच्या उपकाराचं ऋण कसं फेडूं?

**भगवंत**—( प्रवेश करून ) शंकरराव, मला तुमच्याशीं एकांतांत कांहीं बोलायचं आहे.

**गिरिजा**—आहे हा एकांतच आहे. बोला काय तें.

**भगवंत**—तुम्ही असलांत तर चालेल एकवेळ. पण बदचालीच्या माणसांशी संपर्क आम्हांला नको आहे.

**गिरिजा**—हें आम्ही म्हणायचं—तुम्ही नव्हे.

**भगवंत**—ठीक आहे. तुम्हांला आवडतं तिथं मी कशाला तक्रार करूं? ऐका शंकरराव, उद्यांच्या मीटिंगमध्यें तुमच्या फॅक्टरीच्या जागीं रस्ता करण्याचा ठराव येणार आहे. बहुमतानं तो ठराव पास होईल अशी मला खात्री आहे.

**शंकर**—सारेच मेंबर इतके दुष्ट आहेत का?

**भगवंत**—त्यांना काय? त्यांचीं घरं शाबूत आहेत तोंपर्यंत कुणाच्याही घरावरून रूळ फिरला तरी त्याची त्यांना पर्वा नसते. त्यांचं प्रत्यक्ष असं कांहीं नुकसान होत नाहीं.

**गिरिजा**—सार्वजनिक कल्याणाची ही व्याख्या ऐका.

**भगवंत**—मी इथं व्याख्या सांगण्यासाठीं आलों नाहीं. आतां एकदां शेवटचं विचारतों—

**गिरिजा**—कांहीं विचारूं नका. उत्तर एकदांच दिलं आहे.

**भगवंत**—मी शंकररावांना विचारतों आहें.

**गिरिजा**—सॉलिसिटर या नात्यानं मी हें त्यांचंच उत्तर देतें आहें. तुम्हीही आपल्या अशीलाच्या वतीनं अशीच उत्तरं देतां ना? (विठोबा येतो) माझी मुलगी मी तुम्हांला केव्हांही देणार नाहीं.

**विठोबा**—तर मग मला द्या. मी कवि आहें. मी नाटककार आहें. सार्वजनिक कार्यांत पुढाकार घेणारा आहें. काय करूं, तुरुंगांत गेलों असतों तर देशभक्त सुद्धां ठरलों असतों. तेवढं काय तें व्हायचं राहिलं आहे.

**गिरिजा**—देवाची इच्छा असली तर तेंही होईल.

**भगवंत**—ए मूर्खा, टकळी बंद करतोस कीं नाहीं?

**विठोबा**—असं का? म्हणजे तुम्हांला एवढीं मतं गोळा करून दिलीं तो मी मूर्खच का?

**गिरिजा**—यांत काय संशय?

**भगवंत**—आल्या पावलीं इथून चालता हो पाहूं आधीं. माझ्या महत्त्वाच्या कामांत व्यत्यय आणूं नकोस.

**विठोबा**—अशी धमकावणी देऊं नका. तुम्हांला जसं निवडून दिलं तसं खेंचून बाहेरही काढूं शकेन हें ध्यानांत ठेवा.

**भगवंत**—तें शक्य असतं तर मीही तुला भिऊन राहिलों असतों. जा, अनुप्रास जुळवीत बायकांच्या मागनं बॅकबेवर भटकत रहा—जा. शंकरराव, मला तुमच्या तोंडचा शेवटचा शब्द पाहिजे आहे.

**शंकर**—(गिरजेला) काय करूं आतां? दोहींकडून कसा पेचांत पडलों आहें.

**गिरिजा**—श्रीधरपंत, तुमचं काय मत आहे? तुम्ही आतां विलायतेला जाणारच. भगवंतरावांची मागणी आम्हीं कबूल करावी का?

**श्रीधर**—या प्रश्नाचं उत्तर मला देतां येत नाहीं.

गिरिजा—यांची मागणी नाकारली तर हे आमच्या कारखान्यावरून रूळ फिरवणार आहेत. कारखाना एकदां गेला कीं पुन्हा उभारण्याइतकं भांडवल आमच्यापाशीं नाहीं. कारखाना गेला कीं आम्ही तुमच्याइतकेच दरिद्री होऊं. तुमची काय सल्ला आहे ?

श्रीधर—मी दुबळा दरिद्री—तुम्हांला कसली सल्ला देऊं ? बाईसाहेब, रावसाहेब, लाज भीड सोडून मन मोकळं करून बोलतों त्याची मला क्षमा करा. भलता आळ आल्यामुळं मी तुम्हांला पारखा झालों. लहानपणापासून तुम्ही मला पोराप्रमाणें वागवलं पण ऐन आनंदाच्या वेळीं माझ्या तोंडचा घास काढून घेण्याइतकं तुमचं मन माझ्या दुर्दैवानं कठोर झालं. तुमच्या रागाची पर्वा न करतां मी इथं आलों तों केवळ लक्ष्मीच्या प्रेमामुळं. लक्ष्मीचं मन माझ्याविषयीं विटलं आहे असा माझा समज होता. पण आज तो दूर झाला. लक्ष्मीच्या प्रेमासाठीं मी वाटेल तो स्वार्थत्याग करीन. लक्ष्मीचं माहेरघर सुखांत राहण्यांत लक्ष्मीचं कल्याण आहे. माझं काय ? मी तर असा फकीरच आहें. उद्यां इथून जाईन तो पुनः तुमच्या नजरेलाही पडणार नाहीं. माझं विलायतेला जाणं ही एक तात्विक आत्महत्याच आहे. बाईसाहेब, तुमची इच्छा सफल व्हावी अशी ईश्वराची इच्छा नाहीं. मला दिलेल्या वचनांतून मी तुम्हांला मुक्त करतों. खुषाल लक्ष्मी भगवंतरावांना द्या. ईश्वर तिचं कल्याण करो. ( खुर्चीवर बसून तोंड झांकून रडूं लागतो. )

लक्ष्मी—( प्रवेश करून ) आई, मी ऐकलं सारं. मीही तुला सांगतें, बाबांच्या हितासाठीं मी माझा जीव कुरवंडून टाकीन. मी भगवंतरावांशीं लग्न करायला तयार आहें.

शंकर—ज्यांना ज्यांना मी दुःख दिलं त्यांनीं त्यांनीं माझ्यावर उपकाराचीं ओझीं लादावीं, असं झालं आहे. लक्ष्मी, मी इतका निर्दय नाहीं. व्यावहारिक बुद्धीनं माझ्या हातून चुका झाल्या असतील, पण चालत्या-बोलत्या जिवाचं अंतःकरण न समजण्याइतका मी खाटीक नाहीं. जन्मापासून मी तरी कुठं श्रीमंत होतों ? दारिद्र्य आलं तर तें आनंदानं पत्करीन;

पण असल्या सक्तीखालीं माझ्या मुलीचा हात या अधमाच्या हातीं केव्हांही देणार नाहीं.

लक्ष्मी—नका--बाबा, असं म्हणूं नका. आई, तूं बाबांना सांग ग. या पोरीमुळं यांचं घर बुडाल असं लोकं म्हणूं लागलीं तर कुठंही माझा संसार सुखाचा होणार नाहीं. पोरीच्या जातीला जिथं दोरी बांधून देतील तिथं जावं लागतं. मी सक्तीनं जात नाहीं. अगदीं मनापासून—अगदीं आनंदानं—अगदीं जिवाच्या उल्हासानं यांच्या घरीं जातें. मरेपर्यंत पश्चात्तापाचा एक शब्द सुद्धां काढणार नाहीं कीं कांहीं तक्रार करणार नाहीं.

गिरिजा—ऊठ पोरी, तुझंच म्हणणं मला पटतं. भगवंतराव, सारी हकीगत तुम्ही ऐकलीच आहे. माझी लक्ष्मी कोणत्या परिस्थितींत तुमच्याशीं लग्न करायला तयार झाली आहे हें तुम्ही पाहातच आहांत. अझूनही तुमचा आग्रह आहे का ? या सक्तीच्या लग्नानं तुमचा संसार सुखाचा होईल असं तुम्हांला वाटतं का ?

**भगवंत**—संसाराच्या सुखाची मला पर्वा नाहीं. मला लक्ष्मी पाहिजे आहे आणि ती मिळत असेल तर वाटेल त्या परिस्थितींत मी चतुर्भुज व्हायला तयार आहें. (नारायणराव, भद्रा, इन्स्पेक्टर, चंपा व छबी प्रवेश करतात.)

**नारायण**—करा तर पुढं हात. या हातकड्या तयार आहेत.

**इन्स्पेक्टर**—भद्राबाई, या गुन्ह्यांतला तुमचा साक्षीदार हाच का ?

**भद्रा**—अहो, याच मेल्यानं मला फशी पाडली हो. माझं यांचं कांहीं वांकडं नव्हतं. केवळ पैशाच्या आशेनं या मेल्याच्या नादाला लागून मी चंपेला श्रीधरपंताकडे पाठवून त्याच्यावर निष्कारण बालंट घेतलं. विठोबा, कायरे झालं हें ?

**इन्स्पेक्टर**—पकडा या बदमाषाला—बरा इथंच सांपडला. विठोबा, श्रीधर गोविंद देशपांडे यांच्या खोलींतील नाटकाची चोपडी व बँकड्रॅफ्टस चोरल्याच्या गुन्ह्याबद्दल मी तुला कैद करतों.

**विठोबा**—अहो, कोण म्हणतं असं ? ( बाबासाहेब येतो )



नं. ........
ता. ........

**बाबासाहेब**—ही ग्या चोपडी—श्रीधरपंत—हे बँकडूफटस आहेत यांत. ही चोपडी या विठोबानं माझ्याकडे दिली.

**विठोबा**—काय मूर्ख मी ! नक्कल करून दिली नाहीं. मूळ चोपडी दिल्यानं असा घात झाला. घाला बिड्या हातांत. परत आल्यावर देशभक्त तरी ठरेन.

**चंपा**—अहो, पण माझ्या हातकड्या नाहीं का काढित ? यांना पकड-ल्यावर मला सोडीन असं म्हटलं होतंत ना ? वाः ?

**इन्स्पेक्टर**—तें काम कोर्टाचं आहे. सर्व हकीगत सांगून तुम्हीं सरकारी कामाला मदत केल्यामुळं तुम्हांला माफीचा साक्षीदार करण्यांत येईल. (पोलिस शिपाई, भद्रा, चंपा, विठोबा व भगवतराव यांस घेऊन जातात. )

**शंकर**—हें काय आहे गौड बंगाल ?

**बाबासाहेब**—श्रीधरपंत, हा पहा आजचा 'नवा काळ' 'श्रीयुत श्रीधर गोविंद देशपांडेकृत 'दिव्यलावण्य' या नाटकाचा प्रयोग लवकरच करून दाखविण्यांत येईल' ! झालं ना तुमचं समाधान ?

**शंकर**—अरे, पण मला याचा कांहीं उलगडा करून द्याल कीं नाहीं ?

**नारायण**—तें कांहीं नाहीं. गिरिजाबाई सांगतील सर्व हकीगत—आधीं श्रीधरचा हात लक्ष्मीच्या हातांत द्या. ( दयाळशेट येतो. )

**दयाळ**—ये चाल ना बाबा—किती वाट बगावा—ते कुकच्या हापि-सांत जायचा हायना? माज्या तो काय इंग्रजी कळता नथी. तुज्या आला नाय तो माज्या काय काय करेल तिकडूनशीं ?

**श्रीधर**—रावसाहेब, हेच दयाळशेट. यांच्याच बरोबर मी विलायतेला जातों आहें.

**दयाळ**—जयगोपाळ शेट—चाल बाबा चाल—लय वखत झाला.

**नारायण**—पांच मिनिटांत यांना घेऊन येतों. आपण पुढं चला.

**दयाळ**—जलद्दी घेऊनशी ये, बाबा—जयगोपाळ मंडळी ! ( जातो. )

गिरिजा—नारायणराव, हार आणले आहेत ना मी सांगितल्याप्रमाणं ऐकलं, हा हार श्रीधरपंतांच्या गळ्यांत घालायचा.

शंकर—शतायुषीभव—जा, श्रीधर, विलायतेंत हिंदुस्थानचं नांव गाजवून यशस्वी होऊन ये.

छबी—श्रीधरभाऊ, हा माझा हार ! विलायतेंतून येतांना मला डोळे मिचकवणारी बाहुली घेऊन ये बरं का ?

श्रीधर—( गिरिजेला ) बाईसाहेब, आई,—( गहिंवरतो. )

गिरिजा—आतां बोलायचं ना ? लक्ष्मी, थांब, तुझा हार यावेळीं नाहीं घालायचा. विलायतेंतून परत आल्यावर पहिल्याच मुहूर्तावर—काय, ऐकलं का?

शंकर—ऐकायचं काय ? तें आतां ठरलंच. श्रीधरचं लग्न लक्ष्मीबरोबर व्हायचं हें सांगायला कांही कुणी ज्योतिषी नको आतां.

श्रीधर—लक्ष्मी, हार घेऊनच मी आज इथं आलों. बाईसाहेब म्हणतात त्याप्रमाणं हा हार आतां लग्नाच्या बोहल्यावर. ( जाऊं लागतो. )

नारायण—अरे, माझा हार घ्यायचा नाहीं वाटतं ?

श्रीधर—तुझ्यामुळं तर हा आनंदाचा दिवस ! ( दोघे जातात. शंकररावही त्यांच्याबरोबर जातो. )

गिरिजा—लक्ष्मी, जिव्हाळ्यांचं माणूस लांबच्या प्रवासाला निघालं कीं डोळ्यांतून टिपं काढूं नयेत.

लक्ष्मी—आई, सर्वांनीं हार घातले. माझा हार असाच राहणार.

गिरिजा—जुन्या गोष्टींची आठवण ह्मणून हा हार असाच जपून ठेव. त्याच्या दर्शनानं तुला धीर येईल. विलायतेंतून श्रीधर परत आला कीं हाच हार त्याच्या गळ्यांत घाल. जुन्या गोष्टी विसरून जा आणि नव्या उल्हासानं नवा खेळ खेळूं लागा.

( पडदा पडतो. )

ॐ तत्सत्

मराठी ग्रंथ संग्रहालय
५५५